


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. २६ मार्च २०२६

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ११७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# मंत्री नरहरी झिरवाळांचा वादग्रस्त व्हिडिओ समोर

## शासकीय निवासस्थानात ट्रांसजेंडर व्यक्तीसोबत कॅमेऱ्यात कैद झाल्याने खळबळ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याच्या राजकीय वर्तुळात आज एका अत्यंत वादग्रस्त आणि खळबळजनक व्हिडिओमुळे मोठी खळबळ उडाली आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा एका ट्रान्सजेंडर व्यक्तीसोबतचा अश्लील व्हिडिओ समोर आला असून, यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, हा प्रकार मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी घडल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात असून, शासकीय मालमत्तेचा गैरवापर करून तिथे मद्यपान आणि अनैतिक व्यवहार चालत असल्याचा गंभीर आरोप आता होऊ लागला आहे.



यासंबंधीच्या वृत्तानुसार, ट्रान्सजेंडर असलेल्या पवन यादव याच्यासोबत मंत्री झिरवाळ यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आल्याचा दावा केला जात आहे. हा व्हिडिओ पवन यादव याचा भाऊ रवी यादव यांनी सार्वजनिक केल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

> जनतेच्या विश्वासावर निवडून आलेल्या मंत्र्याने किमान नैतिकतेची चौकट तरी पाळावी, ही साधी अपेक्षा असते. मात्र, हा व्हिडिओ पाहता त्या अपेक्षांचा पूर्णपणे भंग झाल्याचे स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्र्यांनी कोणतीही विलंब न लावता नरहरी झिरवाळ यांची मंत्रीपदावरून तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

पवन यादव हा ट्रान्सवूमन असून खंडणी गोळा करण्याचा व्यवसाय करत असल्याचा भावाचा आरोप आहे. यासंदर्भात याआधीच पवन यादव यांच्यावर मुंबईतील कुरार पोलिस ठाण्यात दमदाटी व खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. याचबरोबर, पवन यादव याच्याशी संबंधित प्रकरणात इतर काही मंत्र्यांची नावे देखील पुढे येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, या कथित व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या प्रकारांमुळे शासकीय निवासस्थानाच्या वापराबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संविधानिक पदावर असलेल्या व्यक्तींनी अशा प्रकारे शासकीय सुविधांचा गैरवापर केल्याचा आरोप गंभीर मानला जात आहे.

नरहरी झिरवाळ यांचा हा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला असून, या व्हिडिओची पुष्टी दिव्य मराठी करत नाही. यासंदर्भात आम्ही नरहरी झिरवाळ यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र संपर्क होऊ शकला नाही.

राज्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होणे ही केवळ एक घटना नसून, महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण असल्याची टीका काँग्रेसचे प्रदेशाधक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

एक जबाबदार लोकप्रतिनिधी, ज्याच्यावर जनतेचा विश्वास आणि करदात्यांच्या पैशांची जबाबदारी आहे, त्याच्याकडून अशा प्रकारचे अश्लील आणि अनैतिक वर्तन होणे अत्यंत संतापजनक आणि निषेधार्ह आहे. हा प्रकार केवळ व्यक्तीगत मर्यादांचा भंग नाही, तर सार्वजनिक जीवनातील नैतिकतेलाच काळिमा फासणारा आहे, असेही सपकाळ म्हणाले.

## थोडक्यात...

### भोंदूबाबा खरातवर भाजपचीही 'माया'

**नाशिक (समर्थ गांवकरी) :** महिलांच्या लैंगिक शोषण प्रकरणी पोलीस कोठडीत असणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरातच्या सिन्नर तालुक्यातील श्री शिवनिका संस्थानवर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारप्रमाणेच, त्याआधीचे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील युती सरकार देखील प्रसन्न होते. मार्च 2018 मध्ये आर्थिक वर्ष संपुष्टात येण्याच्या अखेरच्या दिवशी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत खरातच्या श्री ईशानेश्वर देवस्थानच्या एक कोटी पाच लाख रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली होती.

### राज्यात पुढील काही दिवस पावसाचे

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** राज्यातील अनेक भागात मागील काही दिवसांपासून पावसाची नोंद होत आहे. काही ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यांसह गारपीटही नोंदली गेली. दरम्यान, राज्यातील काही भागांना पुढील तीन ते चार दिवस हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तर काही भागात उष्ण आणि दमट हवामान कायम राहणार आहे. राज्यातील हवामान झपाट्याने बदलत असून काही भागात तीव्र उष्णतेचा, तर काही भागात पाऊस आणि गारपीट यांसह सोसाट्याच्या वाऱ्याची नोंद होत आहे. पावसामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र, दक्षिण कोकणातील तूरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली. पुढील तीन ते चार दिवस राज्यातील दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. कोकण प्रदेशातील ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी भागात उष्ण आणि दमट हवामान आहे. यामुळे उत्तर कोकणातील काही प्रदेशात कमाल तपामानातही वाढ झाली आहे. या भागात गुरुवारीही उष्ण आणि दमट हवामान कायम राहणार आहे. तर पुढील तीन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील कमाल तापमानात 1 ते 3 अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. दरम्यान, बुधवारी राज्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद अकोला येथे झाली.

# "रुपाली चाकणकरांनीच अशोक खरातला प्रोमोट केले!"

## महिला आयोगाच्या माजी सदस्यांचा गंभीर आरोप

**अकोला : (समर्थ गांवकरी)**

महिला संघटनांच्या विविध बैठकांना रुपाली चाकणकर अशोक खरातला घेऊन जात होत्या. महिलांपुढे त्या अशोक खरातला 'प्रोमोट' करीत होत्या, असा गंभीर आरोप राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्य डॉ. आशा मिरगे यांनी केला. गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याप्रकरणी नाशिकमध्ये कॅप्टन अशोक खरातला पोलिसांनी अटक केली. या प्रकरणात विविध धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या डॉ. आशा मिरगे यांनी अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावर निशाणा साधला. डॉ. आशा मिरगे म्हणाल्या, आपल्या आजूबाजूच्या महिलांना भोंदूबाबापर्यंत नेण्याचे काम



रुपाली चाकणकर यांनी केले. प्रत्येक महिलेला त्यांनीच नेले, असे मी म्हणणार नाही. पण अनेक महिलांना त्यांनीच नेले. महिला संकटनांची बैठक असतांना हा भोंदूबाबा त्या ठिकाणी जात होता. त्या बैठकांमध्ये जाहीरपणे रुपाली चाकणकर त्या भोंदूबाबाला गुरू म्हणून संबोधन होत्या. आज मी ज्या ठिकाणी आहे, ती यांच्यामुळे पोहचली आहे. हे माझे पांडुरंग आहेत, अशा प्रकाराचे वक्तव्य करीत होत्या. प्रत्येक महिलेला त्यांच्यासारखे पद, व्यक्तिमत्त्व व ग्लॅमर मिळावं, असं वाटतं होतं. रुपाली चाकणकर त्या महिलांमध्ये बाबाला 'प्रोमोट' करीत होत्या.

# अजितदादांचा घातपात असेल तर आकाश पातळ एक करू

## कोणाच्या बापालाही सोडणार नाही, CM देवेंद्र फडणवीसांचा निर्धार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा महत्त्वाचा मुद्दा मांडला. यावेळी त्यांनी सविस्तर माहिती देत तसह तपासाचे तपशीलही मांडले. आमदार रोहित पवार यांच्या भूमिकेवर देखील फडणवीस यांनी सविस्तर उत्तर देत आपण अपघाताच्या चौकशीच्या विरोधात नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच यात कोणाच्या बापालाही सोडणार नसल्याचे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी रोहित पवारांना दिले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, एक अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील मुद्दा सन्माननीय रोहित पवार आणि इतरही अनेकांनी हा मांडला आहे. मी सुरुवातीला याची वस्तुस्थिती मांडतो. दिनांक 28.1.2026 रोजी बारामती विमानतळ येथे धावपट्टी लगत VSR कंपनीच्या विमानाचा अपघात झाला आणि या दुर्घटनेत अजितदादा पवार यांच्यासह 5 जणांचा मृत्यू झाला. यासंदर्भात केंद्र



सरकारने जी काही एसओपी आहे त्यांची कारवाई सुरू केली. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे देखील आपण चौकशी दिली आहे. सीआयडी याचा तपास एसपी दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्यात आला आहे. आता त्यातली जी काही निरक्षण आहेत, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी भाडे तत्त्वावर हवाई वाहनांना पुरवठा करण्यासाठी शासनाने दोन एजन्सी नियुक्त केल्या आहेत. दिनांक 27.1.2026 रोजी सायंकाळी 7 च्या सुमारास उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा मुंबई ते बारामती प्रवास निश्चित झाला. या दौऱ्याची माहिती त्यांचे खासगी सचिवांकडून एरो एयरक्राफ्ट सेल्स या कंपनीच्या प्रतिनिधींना देण्यात आले. त्यानंतर 28 तारखेला मुंबई ते बारामतीच्या दौऱ्यासाठी कंपनीकडून 20 वाजून 45 मिनिटांनी विमान बूक करण्याबाबत कारवाई करण्यात आली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पायलट सुमित कपूर यांची ब्रेथ ॲनलायझर टेस्ट 28 तारखेला सकाळी 7 वाजून 9 मिनिटांनी व कोपायलट शांभवी पाठक यांची टेस्ट सकाळी 7 वाजून 13 मिनिटांनी विमानाच्या उड्डाणापूर्वी करण्यात आली. या टेस्टमध्ये अल्कोहोलचा अंश नाही. अजित पवार हे देवगिरी निवसस्थानवरून विमानतळावर सकाळी 7 वाजून 52 मिनिटांनी पोहोचले. अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विमानात बसले आणि विमान सकाळी 8 वाजून 12 मिनिटांनी मुंबई विमानतळावरून उड्डाण झाले. मुंबई विमानतळ परिसर तसेच बारामती विमानतळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करण्यात आले आहेत.

> देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, सदर प्रकरणी पोस्टमॉर्टम रिपोर्ट प्राप्त झाला असून दुर्घटनाग्रस्त विमानातील तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार व इतर चार यांचे मृत्यूचे कारण डेथ ड्य टु मल्टिपल इन्जुरीज असोसियटेड विथ बर्न इन्जुरीज असे देण्यात आले आहे. दुर्घटनाग्रस्त विमानातील मृत्यू पावलेल्या सर्व सदस्यांचे डीएनए अहवाल आले असून ते त्यांच्या नातेवाईकांशी जुळले आहेत. पायलट व कोपायलट यांचा व्हीसेरा व रक्त तपासणी अंती अल्कोहोल अथवा अंमली पदार्थांचे सेवन केल्याचे निष्पन्न होत नाही. दुर्घटनाग्रस्त विमानातील सर्व मृत पावलेल्या सर्व पाच जणांचा व्हीसेरा व रक्त तपासणीत विषाचा अंश आढळून आलेला नाही. तसेच विमानातील स्फोटक पदार्थांचा अंश नसल्याबाबत राखेच्या तपासणीत न्याय सहाय्यक वैज्ञानिक शाळा यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला आहे. अजितदादा यांच्याशी संबंधित लोकांशी चौकशी करण्यात आली असता सदर विमानातून इंधनाचे वेगळे कॅन वाहून नेल्याचे आढळून आले नाही.

# रोहित पवारांचे प्रसिद्धीसाठी माझ्यावर आरोप

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर पलटवार करताना मोठा राजकीय गौप्यस्फोट केला आहे. "अजितदादांच्या अपघातानंतर हॉस्पिटलमध्ये काय घडलं, तिथपासून ते पोस्टमॉर्टमपर्यंतची इत्यंभूत माहिती माझ्याकडे आहे. त्यामुळे मर्यादा ओलांडू नका, अन्यथा मला तोंड उघडावे लागेल," असा खळबळजनक इशारा तटकरे यांनी दिला आहे. रोहित पवारांनी केलेल्या आरोपांनंतर तटकरे यांनी घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. शरद पवार



गटाचे नेते रोहित पवार यांनी नुकताच एक खळबळजनक दावा केला होता की, "खासदार सुनील तटकरे आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांना दिवंगत नेते अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष स्वतःच्या ताब्यात घ्यायचा होता." या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. या आरोपांवर सुनील तटकरे यांनी आज आपली भूमिका स्पष्ट करत रोहित पवारांवर पलटवार केला. रोहित पवारांच्या आरोपांना उत्तर देताना तटकरे म्हणाले, "माझ्यावर टीका होणे ही काही नवीन गोष्ट नाही. २०१४ सालापासून मला सातत्याने टार्गेट केले जात आहे. मात्र, मी कायम अजितदादांसोबत होतो. एनडीएमध्ये सहभागी होण्याचा निर्णय असो किंवा पक्षाची पुढील रणनीती, आम्ही सावलीसारखे त्यांच्या पाठीशी उभे होतो. अजितदादांनी राज्याच्या राजकारणात मिळवलेली पकड आणि त्यांची उंचावलेली प्रतिमा यात आमचाही खारीचा वाटा होता. रोहित पवार प्रसिद्धीसाठी मला टार्गेट करत आहेत."




# इराणने १५ कलमी शांतता प्रस्ताव फेटाळला

## डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का ; युद्ध थांबवण्यासाठी ठेवल्या मोठ्या अटी



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

गेल्या चार आठवड्यांपासून अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध सुरू आहे. मात्र, या युद्धावर आता तोडगा काढण्यासाठी पावलं उचलण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा संघर्ष थांबवण्यासाठी इराणसमोर १५ कलमी शांतता प्रस्ताव ठेवला आहे. पाकिस्तानच्या मध्यस्थीने हा प्रस्ताव इराणपर्यंत पोहोचवण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या प्रस्तावातील काही जाचक अटी इराणला मान्य होणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत असतानाच आता इराणकडून अमेरिकेच्या या १५ कलमी शांतता प्रस्तावावर प्रतिक्रिया समोर आली आहे. इराणने युरेनियमचं संवर्धन थांबवावं, होर्मुझ सामुद्रधुनी खुली करावी आणि अण्वस्त्र निर्मितीचे प्रयत्न बंद करावेत, अशा विविध १५ अटी अमेरिकेने ठेवलेल्या आहेत. पण अमेरिकेच्या या अटी इराणने बुधवारी फेटाळून लावत पश्चिम आशियातील युद्ध संपवण्यासाठी स्वतःचा पाच कलमी युद्धविराम प्रस्ताव जारी केला आहे. या प्रस्तावात युद्धात झालेली नुकसान भरपाई आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवर सार्वभौमत्वाच्या मागणीसह आदी अटींचा समावेश आहे. या संदर्भातील वृत्त इराणच्या सरकारी टीव्हीच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. वृत्तानुसार, 'तेहरानचा आग्रह आहे की संघर्षाचा शेवट केवळ तेहरानच्या स्वतःच्या अटींवर आणि वेळेनुसारच होईल. जेव्हा इराण स्वतः ठरवेल आणि जेव्हा त्याच्या स्वतःच्या अटी पूर्ण होतील तेव्हाच इराण हे युद्ध संपवेल', असं या अधिकाऱ्याने सांगितल्याचं वृत्तात म्हटलं आहे. अमेरिकेन सर्वात महत्वाच्या होर्मुझ सामुद्रधुनीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. इराण होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून दिल्यास त्या बदल्यात तेहरानवरील सर्व निर्बंध उठवले जातील आणि बुशेहर येथे नागरी अणुऊर्जा विकसित करण्यासाठी त्याला मदतही केली जाईल असा प्रस्ताव अमेरिकेने ठेवला आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर

*सर्वांगीण ग्रामीण विकास, डिजिटल पारदर्शकता आणि सामाजिक सक्षमीकरणाला गती देणारा ठाणे जि.प.चा अर्थसंकल्प – रणजित यादव*



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्हा परिषदेचा सन २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाचा मूळ अर्थसंकल्प आज बुधवार, दि. २५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बी. जे. हायस्कूल येथील सभागृहात सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्याकडे अर्थसंकल्पाची प्रत सुपूर्द केली. "राज्यातील नागरी व ग्रामीण संस्कृतीचा समतोल साधत ठाणे जिल्हा परिषद ही विकासाच्या दृष्टीने अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते. अशा या जिल्हा परिषदेचा सन 2025-26 चा सुधारित व सन 2026-27 चा मूळ अर्थसंकल्प सादर करताना मला अभिमान वाटतो. या अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील विकासाचा प्रत्येक पैलू लक्षात घेऊन रचनात्मक व परिणामकारक नियोजन करण्यात आले आहे. पंचायत सशक्तीकरण, ग्रामीण आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ठाणे जिल्हा परिषदेला राज्यस्तरावर मानाचे स्थान मिळाले आहे. हा अर्थसंकल्प केवळ निधी वाटपाचा दस्तऐवज नसून ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला सक्षम, सुरक्षित आणि स्वावलंबी बनविण्याचा संकल्प आहे. सर्वांगीण ग्रामीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण व आरोग्य सेवा, जलसुरक्षा व शाश्वत कृषी, सामाजिक सक्षमीकरण आणि डिजिटल पारदर्शक प्रशासन या पाच प्रमुख तत्वांवर आधारित हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. ई-गव्हर्नन्स व डिजिटल उपक्रमांच्या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख करण्याचा आमचा प्रयत्न राहील. या माध्यमातून ठाणे जिल्ह्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाला निश्चितच नवी दिशा मिळेल," असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले. ठाणे जिल्हा परिषदेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये विविध विभागांसाठी भरीव तरतूद करण्यात आली असून विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभागासाठी रु. १.१५ कोटी तर संकीर्ण सामान्य प्रशासनासाठी रु. २.६१ कोटी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. शिक्षण विभागासाठी रु. ११.३६ कोटी तर प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीसाठी रु. २.०८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी बांधकाम विभागासाठी सर्वाधिक रु. १९.८७ कोटी निधी देण्यात आला आहे. लघुपाटबंधारे व जलसंधारण विभागासाठी रु. २.४८ कोटी, तर आरोग्य विभागासाठी रु. ३.७८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागासाठी रु. २ कोटी निधी प्रस्तावित आहे. कृषी विभागासाठी रु. ३.७४ कोटी तर पशुसंवर्धन विभागासाठी रु. ३.७२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. समाजकल्याण विभागासाठी रु. ९.७९ कोटी व दिव्यांग कल्याणासाठी रु. ३.०५ कोटी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. महिला व बालकल्याण विभागासाठी रु. ४.८९ कोटी तर ग्रामपंचायत विभागासाठी मुद्रांक शुल्क वाटपासाठी रु. ३७.५० कोटी आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानासाठी रु. ३.६५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच वित्त विभागासाठी विविध प्रशासकीय बाबींसाठी सुमारे रु. ०.६७ कोटी निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

अशा प्रकारे सर्व विभागांना समतोल निधी वाटप करून सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी माहिती दिली आहे.

### अर्थसंकल्पाचा एकूण आढावा

सन २०२६-२७ या वर्षासाठी एकूण अंदाजपत्रकीय जमा रु. ११६.९९ कोटी इतकी असून एकूण खर्च रु. ११६.९३ कोटी प्रस्तावित करण्यात आला आहे. वर्षअखेरीस रु. ५.८४ लाख इतकी शिल्लक अपेक्षित आहे.

## क्लायमेट चेंजविरोधात महत्त्व पूर्ण पाऊल



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

इंडिया बिल्डिंग सस्टेनेबल क्लायमेट चेंज" या प्रकल्पांतर्गत चाईल्ड फंड इंडिया यांच्या माध्यमातून दहा शाळांमध्ये ग्रीन स्कुलकमिटीची यशस्वी स्थापना करण्यात आली आहे. पर्यावरण संवर्धन व हवामान बदलाच्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे. प्रत्येक शाळेमध्ये १५ ते २० सदस्यांचा समावेश करून या ग्रीन कमिट्या स्थापन करण्यात आल्या आहेत. चाईल्ड फंड इंडिया संस्था मढ व प्रकल्पाचे अॅम्बेसिडर रविंद्र भोर व मिथुन मोजाड यांच्या मार्गदर्शनाखाली या कमिट्यांची स्थापना करण्यात आली.यावेळी त्यांनी ग्रीन स्कुल कमिटीचे उद्दिष्ट,कार्यपद्धती, तसेच पर्यावरण संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.या प्रकल्पाला सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी संस्थेचे वरीष्ठ प्रकल्प अधिकारी अभिजित मदने यांच्या मार्गदर्शनाखाली अजित सौर, समन्वयक विश्वास गालफडे, संजय नवले,योगेश मस्करे,मंगेश आतकर, रवि शिंदे यांनी आयोजन केले. या कमिट्यांमध्ये गावातील सरपंच,उपसरपंच,पोलीस पाटील, अंगणवाडी शिशिका शिक्षक, विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, युवक व स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात आला. यामुळे शाळा आणि गाव पातळीवर पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण होण्यास मोठी मदत होत आहे.दरम्यान,याउपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून खिरेश्वर खुबी करांजळे या ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे येत्या २८ तारखेला ग्रामस्वच्छता अभियान आयोजित करण्यात आला आहे.

या अभियानात विद्यार्थी शिक्षक,ग्रामस्थ,विद्यार्थी व ग्रीन कमिटीचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी होणार असून स्वच्छता कचरा व्यवस्थापन व पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यां मध्ये पर्यावरणाबाबत जागृकता व त्याची जबाबदारीची भावना निर्माण होण्याबरोबरच गाव पातळीवर स्वच्छ व हरित वातावरण तयार करण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत.

## नगर–मनमाड महामार्गावरील वाहतूक कोंडी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

समाजातील प्रश्नांवर तत्काळ निर्णय घेऊन प्रत्यक्ष कृतीतून शब्द पाळण्याची परंपरा जपणारे भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी नगर–मनमाड राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडीच्या समस्येवर ठोस पाऊल उचलत होमगार्डचे तब्बल सुमारे सात लाख रुपयांचे मानधन स्वतःच्या पुढाकारातून जमा करून दिलेला शब्द खरा ठरवला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतूक सुरळीत राहावी यासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे राहुरी परिसरातील वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या माध्यमातून नगर–मनमाड राष्ट्रीय महामार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

## लोकशाहीर भीमराव ठोगिरे भारत गौरव पुरस्काराने सन्मानित

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

प्रेरणा फाउंडेशन महाराष्ट्र या सामाजिक संस्थेचा २२ मार्च २०२६ रविवार रोजी प्रेरणा फाउंडेशनचा ८ वा वर्धापन दिन सोहळा दुपारी २ ते संध्याकाळी ६ वाजता सत्कर्म बालकाश्रम, बदलापूर येथे भारत गौरव पुरस्कार २०२६ पुरस्कार वितरण करून धुमधडाक्यात साजरा झाला.या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन प्रेरणा फाउंडेशनच्यासंस्थापिका अध्यक्षा प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले.यावेळी जुन्नर तालुक्यातील आदिवासीसमाजा तील भूषण लोकशाहीर भीमराव ठोगिरे यांना भारत गौरव पुरस्कार,प्रेरणा मॅडम व या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले

या कार्यक्रमात अविनाश म्हात्रे यांचे यांचा जुनी नाणी संग्रह हा पुस्तकं प्रकाशन सोहळा ही पार पडला.२६ एप्रिल हा प्रेरणानाट्य मंडळ माध्यमातून प्रेरण वैभव कुलकर्णी याच्यास्वलीखित स्वदिग्दर्शीत नाटकाचा कार्य क्रमासाठी तिकीट विक्री करून ९०% अपंग मुलगी मोहिनी बुमावर हिच्या उपचारासाठी करणार आहेत तर तिकीट विक्रीचे आव्हानही करण्यात आले प्रेरणा फाउंडेशन हे एक सामाजिक संस्था असून प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. प्रेरणा फाऊंडेशन गेले सहा वर्ष सतत गोर गरीब लोकांना,रस्त्यावरील भटकी लोकांना,अनाथांना आधार देण्याचे काम करते. अनेक आदिवासी पाडे सुधारणे, आदिवासी गावाला रस्ता,बीज, पाणी व लाईट याची सोय,नद्या, चौपाटी,एस.टी.डेपो,रेल्वे स्टेशन रस्ते,ठिक ठिकाणी




स्वछता अभियान राबविणे,अनेक अनाथालय,वृद्धाश्रम,अनाथ रस्त्यावरील भटकी मुले यांना सहारा व सहकार्य देण्याचे काम करते व तसेच प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ व प्रेरणा इन्स्टिटयूट अंतर्गत येणारे उपन्न प्रेरणा वैभव कुलकर्णी ह्या कॅन्सरग्रस्त, किडनीग्रस्त ई.मतिमंद निराधार लोकांना आधार देण्यासाठी वापरतात.सत्कर्म आश्रमचे अध्यक्ष नामदेव पेशनेव आश्रम कमिटी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला फाउंडेशनचे सचिव वैभव कुलकर्णी, खजिनदार रोहन गावकर,शैलेश सणस,हर्षल शिंदे,उर्मिला चौधरी मंगेश सावंत यांचे विशेष सहकार्य लाभले.

प्रेरणा फाउंडेशनच्या संस्थापिका प्रेरणा कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले, लोकशाहीर भीमराव ठोगिरे यांच्या पोवाड्या ने व अल्पोहारने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे डिजिटल व्यवहारांना नवे बळ : डॉ. शीतल गिरमे

*समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न*

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे व समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेज मेंट बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने 'गुणवत्ता सुधार योजने' अंतर्गत ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी या विषया वर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी विद्यार्थ्यांना तज्ञ मार्गदर्शक म्हणून विषयतज्ञ डॉ.शीतल गिरमे उपस्थित होत्या संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करून एकदिवसी य कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यशाळेमध्ये पुणे, अहिल्यानगर,नाशिक विभागा तील अभियांत्रिकी महाविद्यालये बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ लोणेरे कार्यरतशिक्षक वर्ग तसेच औद्योगिक क्षेत्रातील बहुसंख्य कर्मचाऱ्यांनी उस्फूर्त पणे सहभाग नोंदवला. सध्या डिजिटल युगात माहिती सुरक्षित ठेवणे,आर्थिक व्यवहार पारदर्शक पद्धतीने करणे ही मोठी गरज बनली आहे या पार्श्वभूमीवर 'ब्लॉकचेन' हे तंत्रज्ञान माहिती साठवण्याचे अत्यंत सुरक्षित आणि आधुनिक माध्यम म्हणून पुढे येत आहे. भविष्यात इंटरनेट वापरण्याची पद्धत बदलण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असल्याचे संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी सांगितले.डॉ.शीतल गिरमे यांनी ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि त्याचे विविध प्रत्यक्ष जीवनातील अनुप्रयोग या विषयावर सखोल आणि माहितीपूर्ण मार्गदर्शन केले.त्यांनी विद्यार्थ्यांना ब्लॉक चेनप्रणालीची मूलभूतसंकल्पना विकेंद्रीत रचना,डेटा सुरक्षितता आणि पारदर्शक व्यवहारांची प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती दिली.तसेच प्रात्यक्षिक सादरीकरणाद्वारे ब्लॉकचेन नेट वर्कमध्ये व्यवहार कसे नोंदवले जातात,ब्लॉक्स कशा प्रकारे तयार होतात व ते साखळी प्रमाणे कसे जोडले जातात याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. त्यांनी बँकिंग,पुरवठा साखळी व्यवस्थापन,डिजिटल व्यवहार, स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स व ई-गव्हर्नन्स यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा होत आहे याची प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची विकेंद्रीत रचना ही त्याची मुख्य वैशिष्ट्ये मानली जातात.माहिती एका ठिकाणी न साठवता हजारो संगणकांवर एकाच वेळी साठवली जाते.त्यामुळे पारदर्शकता वाढते आणि फसवणुकीची शक्यता कमी होते.तसेच प्रगत क्रिप्टोग्राफी मुळे माहितीचे संरक्षण अधिक मजबूत होते.या तंत्रज्ञानाचा वापर केवळ डिजिटल चलन व्यवहारांपुरता मर्यादित नसून बँकिंग-वित्त,शेतीतील पुरवठा साखळी व्यवस्थापन,स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्सद्वारे करारांची अंमल बजावणी तसेच मतदान प्रणाली मध्ये पारदर्शकताआणण्यासाठी ही केला जात आहे.त्यामुळे येत्या काळात ब्लॉकचेन विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे यांनी व्यक्त केले.




## बोगस दिव्यांग शिक्षक आढळले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषदेत बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. दोन आठवड्यापूर्वी १५ बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केल्यानंतर आता पुन्हा तीनजणांचे दिव्यांग प्रमाणपत्र ४० टक्केपेक्षा कमी आढळले आहे. हे तिघेही शिक्षक असून त्यांचा खुलासा मागवल्यानंतर त्यांच्यावर पुढील कारवाई होणार आहे. नाशिक या ठिकाणी जिल्ह्यातील ४१ दिव्यांग शिक्षकांची यादी तयार करून ते खरोखर दिव्यांग आहे की नाहीत, याची पडताळणी केली होती. या पडताळणीचा अहवाल जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्याकडे प्राप्त झाला असून यात ३ बोगस लुळे-पांगळे गुरूजी सापडले आहेत.

## रामवाडीत महाआरोग्य शिबिराचे आयोजन

महिलांसाठी ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी मशीनचे लोकार्पण

**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**

सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त डिसेंट फाउंडेशन,पुणे आणि श्रीराम देवस्थान ट्रस्ट,रामवाडी निरगुडे, ता:- जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमा ने भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात विविध आरोग्य तपासण्यांसह महिलांच्या आरोग्यावर विशेष भर देण्यात आला.या प्रसंगी पोर्टएस्कॅप इंडिया प्रायव्हेट लि. कंपनीच्या सीएसआर निधीतून महिलांच्या स्तन कर्करोगाच्या पूर्व तपासणी साठी ब्रेस्ट कॅन्सर स्क्रीनिंग मशीनचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी 'आस्था' उपक्रमांतर्गत १६७ महिलांची ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी करण्यात आली. शिबिरा दरम्यान मार्गदर्शन करताना तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अश्विनी कुळमेथे यांनी महिलांना आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील महिला लाज किंवा आर्थिक अडचणींमुळे अनेकदा आजाराकडे दुर्लक्ष करतात.स्तनाचा कर्करोग पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यात ओळखल्यास पूर्णपणे बरा होऊ शकतो मात्र उशिरा निदान झाल्यास तो जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे वेळेत तपासणी करणे अत्यावश्यक आहे.तसेच गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगा विषयी माहिती देताना त्यांनी १४ वर्षांच्या मुलींना HPV लस घेण्याचे आवाहन केले. ही लस भविष्यातील धोकेटाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून ती प्राथमिक आरोग्य केंद्रात विना मूल्य उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी दिली.या शिबिरात विघहर्ता मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीममार्फत रक्तदाब, शुगर, हृदय व मूत्ररोग तपासण्या करण्यात आल्या. माऊली आय केअरच्या माध्यमातून नेत्र तपासणी करून ११७ गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.हिंद लॅबमार्फत रक्त तपासण्या करण्यात आल्या तर दंततज्ज्ञ डॉ. जागृती ताजने यांनी दंत तपासणी केली. या कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अश्विनी कुळमेथे,डिसेंट फाऊंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई,सचिव डॉ.एफ.बी.आतार,डॉ. दयानंद गायकवाड,डॉ.अशितोष बोळीज डॉ.जागृती ताजने,नेत्रतज्ज्ञ विकास बोन्द्रे,आरोग्य सेवक विवेक अत्रे,अलका मुंढे, तपासणी तज्ज्ञ ज्योत्स्ना चतुर, सपना बेलवटे,उज्वला गवळी, छाया पाटील,रेश्मा ढोमसे,पुजा शिंदे,रुपाली कुटे,यश शिनगर, मंगेश पवार,मानसी बोळीज, आशा सेविका तसेच श्रीराम देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष महेश ताजने व इतर पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सराफ व्यावसायिकाची १३ लाख ८० हजारांची फसवणूक

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील एका सराफ व्यावसायिकाची तब्बल 13 लाख 80 हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अमोल विलास चिंतामणी (वय 49, रा. कोर्ट रोड, जामखेड) हे वैशाली ज्वेलर्स नावाचा सराफी व्यवसाय चालवतात. दि. 17 मार्च 2026 रोजी दुपारी सुमारास आप्पासाहेब ज्ञानदेव देवकाते (रा. काटेवाडी) हा त्यांच्या दुकानात आला. त्याने आपला मित्र धम्मसागर हिरालाल समुद्र (रा. सारोळा) याने आयसीआयसीआय बँकेत घेतलेले गोल्ड लोन सोडवण्यासाठी तातडीने पैशांची गरज असल्याचे सांगितले. त्यावर विश्वास ठेवून अमोल चिंतामणी यांनी त्यास 13 लाख 80 हजार रुपये रोख स्वरूपात दिले. मात्र, संबंधित रक्कम परत न करता आरोपींनी फसवणूक केल्याचे समोर आले. या प्रकारात आयसीआयसीआय बँकेचे मॅनेजर गायकवाड (पूर्ण नाव माहिती नाही) यांनीही संगनमत करून पदाचा गैरवापर केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याप्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 154/202 तसेच 318(4), 316, 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.




## प्रभू रामचंद्र म्हणजे एक शक्तीचेच रूप : श्री भास्करगिरीजी महाराज

**मुकींदपुरच्या श्रीराम साधना आश्रमातील पंचदिनात्मक सोहळयाला गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांची भेट**

**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील मुकींदपुर येथील चारी क्रमांक तीन जवळ असलेल्या रामनगर येथील गुरुवर्य महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांनी स्थापित केलेल्या श्रीराम साधना आश्रमात आयोजित पंचदिनात्मक सोहळयाला श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पिठाचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी भेट देऊन प्रभू श्रीरामचंद्राचे दर्शन घेतले.प्रभू रामचंद्र म्हणजे एक शक्तीचेच रूप असून अयोध्येत अनेक संघर्षानंतर निर्माण झालेले मंदिर हे जगाच्या श्रद्धेचे व संस्काराचे मंदिर असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले.



यावेळी श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत स्वामी श्री सुनीलगिरीजी महाराज यांनी स्वागत करत आश्रमातील विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी महंत श्री सुनीलगिरीजी महाराज,भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद चैतन्य,उद्योजक बाळासाहेब शिंदे पाटील, दत्ताभाऊ कांगुणे,संतसेवक वैभव निकम,सीताराम निपुंगे,पोपटराव निपुंगे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे यांच्या हस्ते गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांचे संतपूजन करण्यात आले. यावेळी बोलताना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की श्रीराम साधना आश्रमच्या जागेत एकेकाळी सत्कर्म घडलेले असेल म्हणून तर येथे श्रीराम साधना आश्रमाची स्थापना महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांनी याठिकाणी केली वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांनी येथील परमार्थ फुलविला असून भक्त गण ही मोठया भक्तिभावाने येथील धार्मिक उत्सवात सहभागी होतात याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. अयोध्येत पाचशे वर्षाच्या संघर्षानंतर प्रभू रामचंद्रांचे मंदिर बांधले आहे आपली पिढी भाग्यवान असून हे मंदिर आपल्या साक्षीने निर्माण झाले,सर्वांच्या भक्ती व निष्ठेचे फळ आहे प्रभू रामचंद्र हे एक शक्तीचेच रूप आहे श्रीराम जपाने आपल्याला एक ऊर्जा मिळते,ईश्वराने जे दिलेले आहे त्यातून सुटका होण्यासाठीच दानधर्म आहे,धर्म कार्याला बळकटी येण्यासाठी दानधर्म महत्वाचा आहे दानधर्म केल्याने आपल्या संपत्तीला ही सुगंध प्राप्त होतो असा संदेश देऊन त्यांनी आम्हाला आता जवळ घ्या असे मागणे आपल्याला देवाकडे करायचे आहे,त्यासाठी आता देवासाठी लाडके व्हा असे आवाहन यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या प्रवचन सोहळा कार्यक्रम प्रसंगी देवगडचे सेवेकरी बाळू महाराज कानडे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,गणेश महाराज शेजुळ,संतसेवक बदाम महाराज पठाडे, श्रीधर महाराज अनुभुले,हंडीनिमगावचे सरपंच भिवाजी आघाव,उद्योजक बाळासाहेब शिंदे, दत्ताभाऊ कांगुणे, आश्रम सेवेकरी सीताराम निपुंगे,पोपट महाराज निपुंगे,वैभव निकम,प्रशांत पवार,बाळू गोरे,शुभम सुरवसे,रंगनाथ बानकर,अशोक पवार,पंडित पवार,गणेश कोळेकर, रामदास सुकाळकर,विठ्ठल धनाळे यांच्यासह महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रविंद्र चव्हाण यांचा बैलगाडीतून भव्य सत्कार

## शेतकरी प्रेमाचा अनोखा आविष्कार



**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

खतगाव (प.दे), ता. मुखेड येथे आज नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र चव्हाण यांचा अभूतपूर्व असा नागरी सत्कार सोहळा उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने झटणाऱ्या लोकप्रतिनिधीचा सन्मान शेतकरी पद्धतीने करण्याचा आगळावेगळा उपक्रम ग्रामस्थांनी राबविला.

लोकसभेत प्रथमच निवडून आल्यानंतर खासदार चव्हाण यांनी संसदेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रभावी आणि आक्रमक भूमिका मांडत आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने सत्कार करण्याचा निर्णय घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सजविलेल्या बैलगाडीतून खासदार चव्हाण यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत त्यांच्या मातोश्री सुंदरताई चव्हाण व सौभाग्यवती सोनियाताई चव्हाण यांचा सहभाग विशेष आकर्षण ठरला. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीसह आणि घोषणांच्या गजरात संपूर्ण गाव जल्लोषात न्हाऊन निघाले.

या सोहळ्याची संकल्पना नांदेड जिल्हा सहकारी पतपेढीचे चेअरमन तथा प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष दत्ता भोसले (बंडू पाटील) यांनी मांडली होती. त्यांच्या पुढाकारातून व भोसले परिवाराच्या नियोजनातून कार्यक्रम अत्यंत भव्य आणि संस्मरणीय ठरला. तसेच नायगावकर व भोसले परिवारातील जिव्हाळ्याच्या नात्यामुळे कार्यक्रमाला भावनिक रंग प्राप्त झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनमंत पाटील बेटमोगरेकर होते. यावेळी बळवंत पाटील बेटमोगरेकर, देविदास बसवदे, जीवन पाटील वडजे, दत्ता पाटील बेटमोगरेकर, सुरेश पाटील पाळेकर, अशोक पावळे, बाबासाहेब शिंदे, विठ्ठल बनबरे,शिवाजी भोसले पाटील फारूक बेग, संतोष कदम, उद्धव ढगे, रमेश पाटील कंडाळकर, माधव होळकर, अशोक पाटील मारतळेकर, सुधाकर थडके, बाबुराव कैलास, बालाजी वडजे, चंद्रशेखर काजळे, मधुकर काटेवाडे, शंकर पाटील, डीडी वडजे, ज्ञानेश्वर फसमले, उद्धव पाटील सूर्यवंशी, संजय अंभोरे पाटील, रमेश पवार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी खासदार चव्हाण यांनी पुढेही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अशीच ठाम भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शेतकरी संस्कृतीचा सन्मान राखत लोकप्रतिनिधीचा गौरव करणारा हा अनोखा सोहळा परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला.



# ईद निमित्त स्नेहभेटीचा कार्यक्रम संपन्न, एकोप्याचे दर्शन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

धर्म, जात-पातीपेक्षा माणुसकीची शक्ती मोठी असते, हाच संदेश देत अर्धापूर तालुक्यातील लहान येथे रमजान ईद निमित्त विशेष स्नेहभेट व शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी जामा मशीद परिसर येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले. रमजान ईदच्या पवित्र पर्वावर आयोजित या कार्यक्रमात मुस्लिम बांधवांनी तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आमंत्रित केले होते. एकमेकांची गळाभेट घेत आणि शुभेच्छांची देवाणघेवाण करत उपस्थितांनी सण उत्साहात साजरा केला. यावेळी बोलताना अनेक वक्त्यांनी, "असे उपक्रम समाजातील बंधुभाव आणि एकता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत," असे मत व्यक्त केले. अर्धापूर तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे ज्येष्ठ पदाधिकारी, युवा कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते. राजकीय मतभेद बाजूला सारून सर्वच पक्षांच्या नेत्यांनी एकाच व्यासपीठावर येऊन मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. सर्व मुस्लिम बांधव लहान यांच्या वतीने करण्यात आले होते. सायंकाळी ७ ते १० या वेळेत पार पडलेल्या या स्नेहभेट कार्यक्रमात येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांचे स्वागत आदराने करण्यात आले. या उपक्रमाचे संपूर्ण तालुक्यात कौतुक होत असून, सामाजिक एकात्मतेचा एक आदर्श 'लहान' ग्रामस्थांनी घालून दिला आहे.

# रक्ताने रक्तावर प्रेम केलं पाहिजे : ह.भ.प. संजय महाराज



**तामसा : (समर्थ गांवकरी)**

रक्ताने रक्तावर प्रेम जर करत नसेल तर देशावर काय प्रेम करणार. रक्ताने रक्तावर प्रेम केलं पाहिजे मनहून आजचा या युगात रामकथेची आवश्यक पडली भाऊ भाऊ चा वेरी झाला आहे. ज्या भावाने आपल्या भावासाठी वनवास स्वीकारलं तेच एक भाऊ भावासाठी राजत्याग करून साधू वेशात वनवासी झाले परंतु आज च्या काळात भाऊ भावाचा वेरी झाला आहे राज त्याग त सोडा घराच्या एक इंच जागा सोडायला तयार नाही. मनहून आज च्या या युगात रामकथेची गरज पडली. पिंपळगाव ता. हदगांव येथे दिनांक 20 तारीख पासून रामकथेची सुरुवात झाली असून सकाळी 11ते 2 वाजेपर्यंत कथाकार राधाकृष्ण महाराज यांच्या श्रीमुखातून रामकथा आणि संध्याकाळी विविध क्षेत्रातून आलेले हभप यांचे कीर्तनकार कीर्तन करत आहे या कीर्तन सोहळा च्या पाचव्या दिवशी हभप विदर्भ रत्न रामायणचार्य संजय महाराज पाचपोर यांनी भावा भावा च्या या युगात जे दुरावा निर्माण होतं आहे. या साठी या युगात रामकथे ची आवश्यकता पडली आहे..पिंपळगाव येथील परम पूज्य सध्दर्म शिरोमणी गोवत्स श्री बालयोगी व्यँकटस्वामीजी महाराज यांनी आयोजित केलेल्या या रामकथेत भक्तांची अलोट गर्दी पाहायला मिळत आहे मराठवाड्यात काशी मनहून पंचकोशीत प्रसिद्ध असलेल्या पिंपळगावात या कथेला आयकऱ्यासाठी नांदेड सह विदर्भ, परभणी, हिंगोली, संभाजीनगर, लातूर, शेजारी राज्य कर्नाटक, तेलंगाणा राज्यातून मुक्कामी आलेले आहेत.

कीर्तनला मृदंग वादक अभिषेक जाधव आळंदी,श्रीकांत गुरुजी पासदगाव,टाळकरी वृंद श्री संत गोरोबा काका वारकरी प्रतिष्ठान पासदगाव, वैराग्यमूर्ती दत्ताबापू वारकरी शिक्षण संस्था हदगांव, मृदंग साधना शिक्षण संस्था जवळाबाजार, श्री संत गोकुळ नाथ महाराज वारकरी शिक्षण संस्था पिंगळी येथील सर्व विध्यार्थी. भजनी दिगंबर कुराडे, मारोती टेकाळे,देवजी नरवाडे,नागोराव पाटणे या सर्व मंडळीनं कार्यक्रमात शोभवाढवली..

# छावा संघटनेच्या वतीने निवेदन

**पांगरी: (समर्थ गांवकरी)**

पांगरी बु, ता.सिन्नर, जिल्हा नाशिक येथील चाणखण बाबा बंधारा गट नं. ५५० व गट नं. ५८२ मध्ये अवैध्य मुरुम उपसा केले बाबत सिन्नर तहसीलदार सुरेंद्र देशमुख साहेब यांना छावा संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. डॉ विलासभाऊ पांगारकर, रमेश आप्पा पांगारकर यांनी निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की, मौजे. पांगरी बु. ता. सिन्नर, जिल्हा नाशिक येथील चाणखण बाबा बंधऱ्यातील गट नं. ५५० व गट नं. ५८२ मध्ये महाराष्ट्र शासन यांच्या नावावरती असलेल्या शेतजमिनीत अवैध्यरित्या मुरुम उपसा /उत्कखनन केलेले असुन सदरील मुरुम हा नॅशनल हायवे १६० च्या नावाखाली काहि ब्रासची परवणगी घेऊन शासनाची दिशाभुल करुन सरासरी १० ते ११ हजारा ब्रास मुरुम उत्कखनन केलेले असुन त्यापैकी काहि मुरम नॅशनल हावेच्या व्यतिरिक्त हा देर्डे ता. कोपरगांव जि. अ. नगर येथे विक्री केलेली आहे.

# अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांची उज्ज्वल कामगिरी

## ए.आर. इन्फोटेकमध्ये सात विद्यार्थ्यांची निवड

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ॲण्ड रिसर्च एकूण सात विद्यार्थ्यांची निवड ए.आर. इन्फोटेक या कंपनीत फुल स्टॅक डेव्हलपर प्रशिक्षणार्थी म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे. या कंपनीच्या मुलाखती दि. २० मार्च २०२६ रोजी परीसंस्थेमध्ये घेण्यात आल्या होत्या. आय टी क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी या विध्यार्थांना नक्कीच फायदा होईल.

या कंपनीच्या मुलाखतीत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ही निवड मिळवली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये एम.सी.ए. विभागाचे कु. कुटे गायत्री नितीन, ढोकणे गायत्री चांगदेव, कासार साक्षी गोरक्षा, काळे कल्याणी ज्ञानेश्वर, म्हस्के ईश्वरी बाबासाहेब, कुमार जाधव महेंद्र नामदेव, कानवडे अभिषेक केशव या विद्यार्थ्यांची निवड झाली. या प्रसंगी ए.आर. इन्फोटेकचे संचालक मा. श्री. रणजीत आंबरे यांनी विद्यार्थांना मुलाखतीला सामोरे जाताना बोलण्याचे कौशल्य चांगले असावे व स्व आत्मविश्वास जास्त महत्वाचा आहे असे मार्गदर्शन केले.



तसेच, या अगोदर TCS या नामवंत कंपनी बिझनेस प्रोसेसिंग आऊटसोर्सिंग (BPO) मध्ये तीस विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली. TCS मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये एम.सी.ए. विभागाचे कु.जाधव प्रतीक्षा दिनकर,गायकवाड समृद्धी सुनील, गायत्री अरुण जाधव, ओमकार उल्हास गुंजाळ, वैद्य विवेक दिनकर, पांडे प्रनोटी संपत, नवले रोशन अनिल, ठाणेकर श्रुती सदाशिव, थोरात शिवानी राजेंद्र, गायकऱ ऋतुजा बाळासाहेब, आहेर शीतल शिवाजी, मंडलिक सुप्रिया नानासाहेब, कासिद ऋतुजा प्रदीप, एम.बी.ए. विभागाचे कु.आवारी निकिता रामनाथ, मंडलिक सुमित सुखदेव, दत्तात्रय विश्वास माने, माने मोहिनी संतोष, पथवे आरती विश्वास, वाकचौरे विशाल संतोष, गोर्डे ऋतुजा रावसाहेब, ढवळे छाया सुरेश, ओंकार संतोष जाधव, हासे वैभव सुदाम, झोळेकर शैलेश शिवाजी, वाकचौरे काजल एकनाथ, मरवट वैष्णवी विनोद, वाकचौरे अनुष्का सुहास, खांबेकर प्रसन्ना संतोष, शर्मा रुपाली बाबूलाल, शिंदे प्रिती सुनील, मालुंजकर वैष्णवी विनोद, शेळके ऋतुजा बाळाजी या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

या सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट तयारी, प्रगल्भ आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले असून त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# लोहा शहरात तीन ठिकाणी स्वच्छतागृह उभारणीला सुरुवात

- नागरिकांच्या मागणीला प्रतिसाद
- आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते तीन स्वच्छता घराचे भूमिपूजन



**लोहा : (समर्थ गांवकरी)**

लोहा शहरातील नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीला प्रतिसाद देत शहरात तीन ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीच्या कामाचा शुभारंभ दि २४ मार्च रोजी उत्साहात पार पडला. या महत्त्वपूर्ण कामाचे भूमिपूजन लोहा–कंधार मतदारसंघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांपासून साचलेली अस्वच्छता दूर करण्याचे काम नगराध्यक्ष शरद पाटील पवार व त्यांच्या टीमने हाती घेतले असून शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्याचा त्यांचा मानस आहे. ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी स्वच्छतागृह उभारणीचा निर्णय घेण्यात आल्याचे आमदार चिखलीकर यांनी सांगितले. शहरात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना स्वच्छतेची सुविधा नसल्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गरज लक्षात घेऊन प्रशासनाने पुढाकार घेतला असून या स्वच्छतागृहांमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. शहरातील नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन तो लवकरच मार्गी लावण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले हस्ते ता राखणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच या सुविधेचा योग्य वापर करून परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले आहे. या प्रसंगी मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, नगरसेवक भास्कर पवार, केशव मुकदम, हरिभाऊ चव्हाण, अविनाश पवार, सतीश निखाते, केतन खिल्लारे, इरबा पवार, तुकाराम दाढेल, सदानंद तेलंग, मारुती जंगले, श्रीकांत मंजलवाड, राजू बोडके, दत्ता वाले, दत्ता शेटे, गणेश बगाडे, माजी सभापती खुशाल पाटील, गंगाधर महाबळे, भानुदास पवार यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णासाहेब पवार आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी लोहा नगरपालिकेच्या वतीने आमदार प्रताप पाटील चिखलीकर व युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमामुळे शहरातील स्वच्छतेच्या समस्येवर मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहेत.

# पोलिसांना गुंगारा देणारा आरोपी गजाआड

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागात एडलवाईज ब्रोकिंग लिमिटेड या कंपनीत गुंतवणूक करा वार्षिक परतावा चांगला देतो, असे आमिष दाखवून कोट्यवधीची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला होता. त्यापैकी दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तिसरा संशयित पोलिसांना गुंगारा देत होता. वर्षभरानंतर फरार आरोपाला गजाआड केल्याचे सहायक पोलीस निरीक्षक सागर पवार यांनी सांगितले. सिद्धेश मनोज काळे (रा. कोलदरे, ता. आंबेगाव), गणेश दत्तात्रय गव्हाणे (रा. साल, बाभुळवाडी) व राहुल दिलीप काळे (रा. शिंदेवाडी) या तिघांनी संगनमत करून शेअर मार्केटिंग व एडलवाईज ब्रोकिंग लिमिटेड या कंपनीच्या नावाखाली २ कोटी ९४ लाख ६३ हजार ८०१ रुपयांचा परतावा न देता फसवणूक केली.

# पालिकेच्या पाणीपुरवठा बिल घोटाळ्याचा आरोप !

## मनसे शहर सचिव प्रशांत गावडे आक्रमक



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा परिसरात ठाणे महापालिकेच्या वाढीव पाणी बिलांबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) चे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे यांनी पत्रकार परिषद घेऊन ठाणे महानगरपालिकाच्या पाणीपुरवठा विभागावर कथित घोटाळ्याचा आरोप केला आहे. मनसेच्या मते, नागरिकांना अत्यंत जास्त आणि चुकीची पाणी बिलं दिली जात आहेत. जुने व त्रुटीपूर्ण मीटर रीडिंग वारंवार दाखवून सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक शोषण केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पक्षाने उदाहरण देत सांगितले की एका नागरिकाचे १ लाख ९६ हजार रुपयांचे बिल सुधारणा करून ८७ हजार रुपयांपर्यंत कमी करण्यात आले, यामुळे बिलिंग प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मनसेने असा देखील आरोप केला आहे की, एकीकडे अर्थसंकल्पात कर वाढवला जाणार नाही असे सांगितले जाते, तर दुसरीकडे चुकीच्या बिलांच्या माध्यमातून नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकला जात आहे. या प्रकारच्या अनियमितता सहन केल्या जाणार नाहीत, असा इशारा मनसेने दिला आहे. तसेच, नागरिकांची लूट थांबवली नाही तर दिवा पाणीपुरवठा विभागाविरोधात मनसे आपल्या शैलीतील आंदोलन छेडले जाईल आणि त्याची पूर्ण जबाबदारी ठाणे महानगरपालिका प्रशासनावर असेल असेही सांगण्यात आले आहे. नागरिकांना आवाहन करताना मनसेने म्हटले आहे की जर पाणी बिल असामान्यरित्या वाढलेले असेल तर आपल्या मीटर रीडिंगची पडताळणी करावी आणि संबंधित विभागाकडे तक्रार नोंदवावी. या प्रकरणामुळे स्थानिक पातळीवर नाराजी वाढत असून आता सर्वांचे लक्ष ठाणे महानगरपालिकेच्या भूमिकेकडे लागले आहे.

# ग्रामीण भागात रेडिओची जादू कायम

*लिंगदेव येथील किसन भागा शेलार आजही आकाशवाणीचे निष्ठावंत श्रोते!*

**स्पेशल रिपोर्ट : संजय फुलसुंदर**

**लिंगदेव : (समर्थ गांवकरी)**

लिंगदेव येथील किसन भागा शेलार (व्यवसाय : चर्मकार) आजच्या मोबाईल-इंटरनेटच्या युगातही रेडिओची परंपरा जपत आहेत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते नियमितपणे आकाशवाणीवरील बातम्या, भजन, कीर्तन तसेच शेतीविषयक कार्यक्रम आवडीने ऐकतात. ग्रामीण भागात अजूनही रेडिओचे वेध कायम असल्याचे त्यांच्या माध्यमातून दिसून येते. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावातही रेडिओची साधी-सोपी माहिती, स्पष्ट आवाज आणि विश्वासार्हता यामुळे शेलार यांच्यासारखे अनेक जण आजही आकाशवाणीशी जोडलेले आहेत.



त्यांच्या मते, “रेडिओमुळे जगाशी संपर्क राहतो, तसेच गावातील काम करतानाही माहिती मिळते,” असे त्यांनी सांगितले.

# ‘नमो उद्यान’ विकास कामाचे भूमिपूजन उत्साहात

## विभागीय स्पर्धेतही उतरणार शहर



**किनवट: (समर्थ गांवकरी)**

किनवट नगर परिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ०३, बेल्लोरी येथील नगरपरिषद मालकीच्या खुल्या जागेत ‘नमो उद्यान’ विकसित करण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हा सोहळा नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद येंड्रलवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. सदर उद्यान विकास काम वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठीच्या अनुदान योजनेअंतर्गत (सन २०२४-२५) मंजूर करण्यात आले असून, या प्रकल्पासाठी एकूण १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. नगर परिषद बांधकाम विभागाच्या कार्यादेश क्र. बांधकाम विभाग/५४४/२०२६, दिनांक ०९ मार्च २०२६ नुसार या कामास अधिकृत प्रारंभ करण्यात आला असून, काम पूर्ण करण्यासाठी ३६५ दिवसांची मुदत निश्चित करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याधिकारी मुगाजी काकडे व कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी नगरविकास अभियंता स्वानंद मामिलवाड यांनी ‘नमो उद्यान’ प्रकल्पाची सविस्तर रूपरेषा उपस्थितांना समजावून सांगितली. उद्यानामध्ये नागरिकांसाठी फिरण्याचे मार्ग (वॉकिंग ट्रॅक), व्यायामासाठी खुली साधने, हरित परिसर, मुलांसाठी खेळण्याची सुविधा आदी विविध उपक्रमांचा समावेश करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, शासनाने ‘नमो उद्यान’ योजनेअंतर्गत राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित केली असून, किनवट नगर परिषदही या स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या स्पर्धेत प्रत्येक विभागातून उत्कृष्ट उद्यानांची निवड केली जाणार असून, प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या नगरपरिषदांना अनुक्रमे मोठा अतिरिक्त विकास निधी प्रदान केला जाणार आहे.

या स्पर्धेचा मुख्य उद्देश म्हणजे नगरपरिषदांमध्ये दर्जेदार, आकर्षक व पर्यावरणपूरक उद्याने विकसित करण्यासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे तसेच शहरांच्या सर्वांगीण विकासाला गती देणे हा आहे. त्यामुळे किनवट नगर परिषद प्रशासनानेही हे उद्यान उच्च दर्जाचे व आदर्श स्वरूपाचे उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. ‘नमो उद्यान’ विकसित झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना विरंगुळा, आरोग्यदायी व्यायाम तसेच पर्यावरणपूरक वातावरण उपलब्ध होणार असून, शहराच्या सौंदर्यातही लक्षणीय भर पडणार आहे. यामुळे किनवट शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

या भूमिपूजन सोहळ्याला नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्यासह नगरसेविका ललिता मारोती मुनेश्वर, नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, माजी उपाध्यक्ष अभय महाजन, सभापती श्रीराम नेम्मानिवार, सामाजिक कार्यकर्ते मुकेश नेम्मानिवार, मारोती मुनेश्वर, इम्रान शेख चांद, अन्वर मिर्झा, शहबाज खान पठाण, शेख अली, आरिफ भाटी, प्रभु कोल्हे, मिना नेम्मानिवार, निरजा नेम्मानिवार, मनिष ताडपेल्लीवार, संतोष बंडीवार, रोहन पिसारीवार यांच्यासह अनेक मान्यवर व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संबंधित कंत्राटदारास काम दर्जेदार पद्धतीने व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रकल्पाची नियमित पाहणी करून गुणवत्तेवर विशेष लक्ष देण्याचे निर्देशही प्रशासनाकडून देण्यात आले.

# खा. नीलेश लंके यांनी घेतली संरक्षण मंत्र्यांची भेट



## पाच महत्त्वाच्या निवेदनांद्वारे विविध प्रश्नांवर ठोस पाठपुरावा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

खासदार नीलेश लंके यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन मतदारसंघाशी संबंधित विविध महत्त्वाच्या व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी एकूण पाच निवेदने सादर करत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. खासदार लंके यांनी माजी सैनिकांना माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजनेअंतर्गत (ईसीएचएस) मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला. अहिल्यानगर येथील माजी सैनिक संतोष जगन्नाथ पिसे यांना डायलिसिससारख्या अत्यावश्यक उपचारासाठी संबंधित रुग्णालयाने ईसीएचएस अंतर्गत सेवा देण्यास नकार दिल्याची बाब त्यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. या प्रकारामुळे संबंधित रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, अशा समस्या इतर माजी सैनिकांनाही भेडसावत असल्याचे त्यांनी नमूद केले. याबाबत तात्काळ योग्य त्या सूचनांचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली. तसेच, मृत सैनिक योगेश बापूराव शिर्के यांच्या पत्नीच्या प्रकरणात सहानुभूतीपूर्वक विचार करून तिला पेन्शनरी लाभ देणे अथवा शासकीय सेवेत पुनर्वसन करण्याची मागणी लंके यांनी केली. संबंधित विधवा आपल्या अल्पवयीन मुलासह अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, अहिल्यानगर व राहुरी तालुक्यातील सैन्य क्षेत्रालगतच्या गावांमध्ये बांधकामासाठी अन-आपत्ती प्रमाणपत्र संदर्भातील परिपत्रकांमधील विरोधाभासामुळे निर्माण झालेल्या गोंधळाचा मुद्दा त्यांनी मांडला. २०११ व २०१६ मधील परस्परविरोधी आदेशांमुळे स्थानिक प्रशासन व सैन्य अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर एकसंध, स्पष्ट आणि अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वे तातडीने जारी करण्याची मागणी करण्यात आली.



**नांदेड जिल्हा :** तालुक्यातील सगरोळी येथील शासकीय रेती डेपो क्रमांक ०१ मधील शिल्लक वाळू साठ्याचा लिलाव प्रक्रिया प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली आहे. या डेपोसाठी झालेला आधीचा लिलाव रद्द करून आता येत्या २७ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली येथे फेर लिलाव आयोजित करण्यात आला आहे.

## थोडक्यात बातम्या...



### लक्ष्मीबाई भाऊराव पाटील स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

श्रीगोंदा (स. गांवकरी) : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या त्यागातूनच रयत शिक्षण संस्था उभी राहिली. त्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यातील प्रेरणादायी सावली होत्या. बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, असे प्रतिपादन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी केले. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. राजाराम कानडे यांनी प्रस्तावना मांडली. यावेळी प्रा. संदीप दरेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, स्त्रियांच्या त्यागातूनच महापुरुष घडतात आणि लक्ष्मीबाईंच्या त्यागातून रयत शिक्षण संस्थेची भक्कम पायाभरणी झाली. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रो. डॉ. नितीन थोरात, अधीक्षक बाळासाहेब राऊत, डॉ. राहुल गायकवाड, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विठ्ठलराव ऊर्फ जनार्दन बाळकृष्ण दरेकर यांचे निधन



घोडेगाव (स. गांवकरी) : ता आंबेगाव येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते कै विठ्ठलराव ऊर्फ जनार्दन बाळकृष्ण दरेकर यांचे वयाच्या 89 व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने घोडेगाव व परिसराचे शिवकला पसरली आहे विठ्ठल उर्फ जनार्दन दरेकर हे मुंबई फ्रुट मार्केट चे व्यापारी व घोडेगाव येथील कृषी औषध व्यवसाय होते त्यामुळे त्यामुळे येथील परिसरातील शेतकऱ्यांशी त्यांचा सलोख्याचा संबंध होता.तसेच सातारा व पुणे या जिल्ह्यांचे अनुक्रमे सहाय्यक वन संरक्षक (ए सी एफ) विश्वास भडाळे ,विलास थोरात व खेड तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब मांदळे यांचे ते सासरी होते. घोडेगाव परिसर व दरेकरवाडी गावाच्या शैक्षणिक व आर्थिक सामाजिक उपक्रमात व जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. शांत व साधेपणा जपणारे आणि कुटुंब वत्सल्य व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती. ते ज्येष्ठ पत्रकार गिरीश दरेकर व उद्योजक अविनाश दरेकर ,निलेश दरेकर, संतोष दरेकर यांचे वडील होत त्यांच्या पश्चात तीन मुली व चार मुले नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दिनांक 1 एप्रिल रोजी घोडेगाव येथील घोड नदीच्या पवित्र पवित्र तीरावर होणार आहे.

### दोन गटांत हाणामारी, दोघे जखमी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : तालुक्यातील गुंडेगाव शिवारात दोन गटांत हाणामारीची घटना घडली असून यामध्ये दोघे जखमी झाले आहेत. याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीवरून अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शुक्रवारी (२० मार्च) दुपारी १२ वाजताच्या सुमारास गुंडेगाव बसस्टँड परिसरात पैशांच्या उधारीच्या वादातून मारहाण झाल्याची घटना घडली. याप्रकरणी सुरेश फाकट्या चव्हाण (वय-६०, रा. गुंडेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अविनाश सिध्दीकर चव्हाण, संगिता सिध्दीकर चव्हाण व सिध्दीकर फाकट्या चव्हाण (सर्व रा. गुंडेगाव) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, उसने दिलेले पैसे मागितल्याच्या कारणावरून संशयित आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच एकाने लाकडी दांडक्याने डोक्यात मारून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादी स्वत: जखमी झाले आहेत. गुरूवारी (१९ मार्च) रात्री गुंडेगावातील ससा टेकडी परिसरात घरासमोर उभ्या असलेल्या विनोद सिध्दीकर चव्हाण (वय-२६) यांच्यावर चौघांनी मिळून हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सय्यदलाल फाकट्या चव्हाण, सुरेश फाकट्या चव्हाण, निलेश सय्यदलाल चव्हाण व अश्विनी नीलेश चव्हाण (सर्व रा. गुंडेगाव) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, संशयित आरोपींनी काठी व दगडांनी मारहाण करत त्यांना जमिनीवर पाडले, तसेच डोळ्यात मिरची पूड टाकून जखमी केले. पोलीस तपास करीत आहेत.

### मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी बाबासाहेब मुदगल तर व्हाईस चेअरमन पदी कैलास चावरे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी ज्योतीताई हराळे यांनी पाहिले. चेअरमन पदासाठी बाबासाहेब मुदगल यांच्या नावाची सूचना संचालक सोमनाथ सोनवणे यांनी मांडली तर अनुमोदन संचालिका प्रमिलाताई पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी कैलास चावरे यांच्या नावाची सूचना संचालक बलराज गायकवाड यांनी केली तर अनुमोदन संचालक अजय कांबळे यांनी दिले.

## कांदा : आ. काशिनाथ दाते सरांची अनुदानासाठी आक्रमक मागणी



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आज विधान भवन, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा ठामपणे मांडत कांद्याला अनुदान देण्याची जोरदार मागणी केली. उपमुख्यमंत्री ना. श्रीम. सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे, ना. छगन भुजबळ, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार तसेच कृषी, पणन व वित्त विभागाचे प्रधान सचिव या बैठकीस उपस्थित होते. पारनेर मतदारसंघासह राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत कमी बाजारभावामुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी विविध आंदोलनांद्वारे आपल्या हक्कासाठी आवाज उठवला आहे. या सर्व आंदोलनांची दखल घेत आणि शेतकरी हिताला प्राधान्य देत आमदार काशिनाथ दाते सरांनी बैठकीत ठाम भूमिका मांडली. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी, पणन व वित्त विभागाच्या प्रधान सचिवांची अभ्यास समिती स्थापन करून आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेऊन अनुदान मंजूर करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या बैठकीत आमदार काशिनाथ दाते सरांनी शेतकऱ्यांच्या भावना प्रभावीपणे मांडत त्यांच्या न्याय्य हक्कासाठी सातत्याने लढा देण्याची भूमिका पुन्हा अधोरेखित केली. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> कांद्याला किमान ५ रुपये प्रति किलो अनुदान देऊन शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, शेतकऱ्यांच्या वाढत्या उत्पादनखर्चाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत आवश्यक आहे, मुंबई विधानभवनात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री सकारात्मक विचार करुन शेतकरी हिताचे निर्णय होईल.
>
> **- आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

## जिल्हा परिषदेचा कनिष्ठ अभियंत्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



जिल्हा परिषद, अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यावर बिले मंजूर करताना अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहे. नुकतेच लाज घेताना गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्या कामांची सखोल चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी नाशिक विभागीय आयुक्त तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला दिले आहे. निवेदनात म्हंटले आहे की, सार्वजनिक बांधकाम उपविभागातील कनिष्ठ अभियंता तथा अतिरिक्त पदभार उपअभियंता म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने दि.२३ मार्च रोजी मौजे देहरे येथील दत्त मंदिर स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या ८ लाख २२ हजार २०६ रुपयांच्या कामाचे बिल मंजूर केले. या बिलाच्या मंजुरीसाठी त्यांनी संबंधित ठेकेदार यांच्याकडे एकूण रकमेच्या २ टक्के, म्हणजेच सुमारे १६ हजार रुपयांची मागणी केल्याप्रकरणी लास्ट लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्यावर नुकताच गुन्हा दाखल केला आहे.

## शांताराम कोकाटे यांची गॅस टंचाईवर मात



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील सुप्रसिद्ध 'शांताराम वडापाव'चे मालक व चालक शांताराम नाना कोकाटे यांनी गॅस टंचाईवर अनोख्या पद्धतीने मात करत चुलीवरच भजी, वडापाव आणि चहा तयार करण्यास सुरुवात केली आहे. अपंगत्वावर मात करत उदरनिर्वाहासाठी त्यांनी व्यवसाय सुरू ठेवण्याचा घेतलेला निर्धार सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

**■ चुलीवरच सुरू 'वडापाव'चा व्यवसाय**

सध्या गॅसची टंचाई निर्माण झाल्याने अनेक व्यावसायिक अडचणीत आले असताना, कोकाटे यांनी हार न मानता चुलीचा पर्याय स्वीकारला. चुलीवर तयार होणाऱ्या वडापाव व भजींची चव ग्राहकांना अधिक रुचकर वाटत असून, त्यांच्या दुकानाकडे ग्राहकांचा ओढा वाढताना दिसत आहे. अपंग असूनही कोणतीही लाज न बाळगता प्रामाणिक कष्टाच्या जोरावर कोकाटे यांनी आपला व्यवसाय सुरू ठेवला आहे. ग्राहकांना चविष्ट वडापाव, भजी आणि चहा देत त्यांनी जिद्द आणि मेहनतीचा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या संघर्षमय प्रवासातून तरुणांना प्रेरणा मिळत असून, ही एक यशोगाथाच ठरत आहे. दरम्यान, कोकाटे यांच्या परिस्थितीचा विचार करता त्यांना गॅस उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सकारात्मक पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## सी ए परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या कु. प्राजक्ता काकडे हिचा सन्मान



**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा येथे सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या अमरनाथ ग्रुपच्या वतीने जेष्ठ विधी तज्ञ स्वर्गीय गोरक्षनाथ काकडे यांची कन्या कु. प्राजक्ता काकडे ही सी ए परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचा सन्मान सत्कारसमारंभात करण्यात आला.झालेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रुपचे मार्गदर्शक व नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील हे होते. यावेळी सोहळयाचे संयोजक व अमरनाथ ग्रुपचे सदस्य रामनाथ जाधव टेलर,शंकरराव ओहोळ,योगेश रासने,शंभूराजे जंगले पाटील यांनी आलेल्या ग्रुपच्या सदस्यांसह आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले.ग्रुपचे सदस्य शिक्षण विभागाचे माजी अधिकारी त्रिंबकराव गायकवाड यांनी अमरनाथ ग्रुपच्या वतीने वर्षभर राबविण्यात येत असल्याची उपक्रमाची माहिती यावेळी बोलतांना दिली.

यावेळी सी ए ची परीक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन करणाऱ्या कु.प्राजक्ता काकडे हीचा सन्मान आई मीनाक्षी काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरनाथ ग्रुपच्या सदस्यांसह ग्रुपच्या महिला सदस्यांच्या हस्ते करण्यात आला. वडिलांनी पाहिलेले स्वप्न मनात बाळगून मी जिद्द व चिकाटीने अध्ययन केले मातोश्री व बहिणी कडून मिळालेल्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळे मी हे यश संपादन करू शकले असे प्राजक्ता काकडेने यावेळी बोलतांना सांगितले.

यावेळी ग्रुपचे मार्गदर्शक नंदकुमार पाटील,सौ. शुभांगीताई पाटील,सौ.वैशालीताई ओहोळ,शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार,युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे, व्यापारी शशिकांत नळकांडे यांनी मनोगत व्यक्त करत कु.प्राजक्ता हिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अमरनाथ ग्रुपचे जेष्ठ मार्गदर्शक रविंद्र जोशी, सदस्य उद्योजक भाऊसाहेब अंबाडे,राजेंद्र उंदरे, मेजर अरुण धनक,राजेंद्र महाजन,बँक मॅनेजर दिलीप जगदाळे, मूर्तिकार बजरंग ईरले,ज्ञानेश्वर उगले,कॉन्ट्रॅक्टर अंबादास ईरले,नगरसेवक जालिंदर गवळी,गणेश चौव्हान,उत्पादन शुल्क विभागाचे सुरेश शिंदे,अँड. अभिजित पाटील यांच्यासह ग्रुपचे सदस्य आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमरनाथ ग्रुपचे प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर ग्रुपचे जेष्ठ मार्गदर्शक रामनाथ जाधव टेलर यांनी उपस्थितांचे आभार मानले. उपस्थित ग्रुपच्या सदस्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# देसवडे–टेकडवाडी रस्ता मजबुतीकरणाला प्रारंभ

## डॉ. प्रदीप दाते यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (सन २०२५-२६) मधून मंजूर झालेल्या देसवडे ते टेकडवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण (अंदाजे २० लाख रुपये) या महत्त्वाच्या कामाचे भूमिपूजन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या वतीने डॉ. प्रदीप दाते यांच्या हस्ते संपन्न झाले. अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ निमित्त आमदार दाते सर व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब मुंबईत असल्याने त्यांच्या वतीने डॉ. दाते यांनी या कामाचा शुभारंभ केला. या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांची दळणवळण व्यवस्था अधिक सुलभ होणार असून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे. यावेळी पांडुरंग गुंड, बंडू औटी, भाऊसाहेब टेकूडे, संपत तोरकड, बाजीराव शिंदे, बबन गुंड, धोंडिभाऊ दाते, माऊली दाते, नवनाथ दाते, पोपट शिंदे, सुरेश तोरकड, सहकारी दाते, भावका दाते, गोविंदा औटी, संदीप औटी, प्रकाश टेकूडे, बाळू गुंड, रभाजी टेकूडे, जिजाभाऊ टेकूडे, मछिंद्र गुंड, रोहिदास कानडे,



शिवाजी टेकूडे, राजेंद्र गुंड, प्रदीप टेकूडे, प्रतुल टेकूडे, हरिचंद्र गुंड, दिपक गुंड, ज्ञानदेव दाते, प्रदीप गुंड, दिनकर दाते, मंगेश हुलावळे, एकनाथ गुंड, संतोष टेकूडे यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. प्रदीप दाते म्हणाले की, "आमदार काशिनाथ दाते सरांचे काम हे नेहमीच समाजाभिमुख राहिले आहे. समाजाभिमुख कार्य म्हणजे केवळ विकासकामे उभारणे नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून त्यांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने त्या कामाचा किती उपयोग होईल याचा विचार करून ते काम उभे करणे, समाजातील प्रत्येक घटकांना समान न्याय देत त्यांना सक्षम करणे आणि त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्यासाठी दाते सर कायम प्रयत्नशील राहिले आहेत. शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास आणि दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी केलेले त्यांचे गेल्या चार दशकातील कार्य पाहिले तर त्यांच्या समाजाभिमुख दृष्टीचा प्रत्यय येतो."

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# बॉयलर अटेंडंट कामगार मेळावा उत्साहात

**इचलकरंजी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य बॉयलर अटेंडंट जनरल कामगार सेनेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त इचलकरंजी येथे भव्य बॉयलर अटेंडंट कामगार मेळावा उत्साहात पार पडला. वेद भवन सांस्कृतिक कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास राज्यभरातील बॉयलर क्षेत्राशी संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सर्जेराव हळदकर होते, तर उद्घाटन दीपक भोसले यांच्या हस्ते झाले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व महाआरती करण्यात आली. या मेळाव्यात शशिकांत पवार (सेवानिवृत्त बॉयलर सुपरवायझर) यांना त्यांच्या 31 वर्षांच्या उल्लेखनीय सेवेसाठी सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट कामगिरीबद्दल अविनाश कांबळे (कोल्हापूर), राजेंद्र माने (सांगली), शिवराज बाबर (सातारा), प्रल्हाद सदावर (चंद्रगड) आणि सौरभ शिवननवर (बेळगाव) यांना 'उत्कृष्ट कामगार पुरस्कार' प्रदान करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या भाषणातून बॉयलर क्षेत्रातील सुरक्षितता, नवीन तंत्रज्ञान आणि तरुणांना रोजगाराच्या संधी यावर मार्गदर्शन केले. तसेच कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. संघटनेतर्फे बॉयलर परीक्षेसाठी ऑनलाईन व ऑफलाईन मार्गदर्शन, राज्यभर कॅलेंडर वितरण, तसेच महामंडळ स्थापनासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचेही जाहीर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश वाकचौरे यांनी केले, तर प्रस्तावना ताराचंद चव्हाण यांनी मांडली. अविनाश कांबळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण 'महा बॉयलर AGKS' या यूट्यब चॅनेलवर करण्यात आले.



## बुवासाहेब महाराज यात्रा कमेटीच्या अध्यक्षपदी गेणूभाऊ तोडमल तर उपाध्यक्षपदी गणेश भांड व सागर शिंदे यांची निवड

### गेणूभाऊ तोडमल अध्यक्ष म्हणून ४२ वर्षे झाले आहे

**राहुरी ता : (समर्थ गांवकरी)**

राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द येथील जागृत देवस्थान बुवासाहेब महाराज यात्रा कमेटीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नागरीक गेणूभाऊ तोडमल यांची तर उपाध्यक्षपदी गणेश भांड व सागर शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. खजिनदार पदी भाऊराव शेडगे यांची सह खजीनदारपदी साहेबराव मोरे यांची निवड करण्यात आली.

राहुरी खुर्द येथील जागृत देवस्थान बुवासाहेब महाराज यांच्या यात्रा कमेटीच्या उत्सव समितीच्या कार्यकरिणी नेमणुकीच्या नियोजन बैठकीचे आयोजन बुवासाहेब मंदिराच्या सभामंडपात करण्यात आले होते, या बैठकीचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरीक मारुती शेडगे हे होते यावेळी साहेबराव मोरे यांनी मागील वर्षाच्या हिशोबाचे वाचन करून शिल्लक रक्कमेचे ग्रामस्था समोर वाचन करण्यात आले. त्यानंतर यात्रा कमेटीची कार्यकारिणी सर्वानुमते ठरवून वरील निवडी जाहीर करण्यात आली.

यावेळी युवक वर्गाकडून डीजे वाजवण्याची परवानगी मिळवण्यासाठी यात्रा कमेटीने सहकार्य करावे अशी मागणी करण्यात आली.अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी पारंपरीक वाद्य म्हणजे सनई, डोल ताशा, झांज पथक, बॅन्ड पथक आदि वाद्य वाजविण्याचा आग्रह करुण डीजेसाठी पोलीस विभागाच्या परवानगीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रस्ताविक डॉ. तनपुरे सह साखर कारखान्याचे माजी संचालक नंदकुमार डोळस यांनी आभार मानले अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी जत्रा शांततेत पार पाडावी त्यांचे मत मांडले, बैठकीत ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र शेटे, राम तोडमल, अमोल डोळस, यांसह ज्येष्ठ नागरीक साहेबराव धोत्रे, निसारभाई शेख, ज्ञानदेव तोडमल, भगवान बाबा पतसंस्थेचे चेअरमन श्री दिलीपराव आघाव, पप्पू पाटोळे, उमाकांत घोरपडे, आकाश शेटे, सुनिल कुमावत, बाबासाहेब पोपळघट, गोरख ससाणे, प्रशांत डोळस,चेतन घोरपडे, यश गोल्हार, निखिल राऊत, बबलू पाटोळे, आशुतोष खाचणे, राजेंद्र खोजे, सुनिल तोडमल, एकनाथ माळी ,दिलीप क्षीरसागर, प्रशांत चोपडे मनोज गरड,संजय डोळस, यांसह पत्रकार भिमराज गुंड अशोक मंडलिक, यांसह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# टँकर प्रथा खरोखर बंद झाली का फक्त भाषणांपुरती मर्यादित?




**डांग, गुजरात : (समर्थ गांवकरी)**

उन्हाळ्याच्या तीव्र तडाक्यात डांग जिल्ह्यातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. एकीकडे डांगचे आमदार विजयभाई पटेल आपल्या सार्वजनिक भाषणांमध्ये माजी सरकारच्या "लाल टँकर प्रथा"ला पूर्णविराम दिल्याचा दावा करत आहेत, तर दुसरीकडे वास्तव काही वेगळंच चित्र दाखवत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वर्ष २०२४-२५ आणि २०२५२६ दरम्यान त्यांच्या च निधीतूनच पाणीपुरवठ्यासाठी नवीन टँकर खरेदी करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील गंभीर पाणीटंचाई लक्षात घेता हे पाऊल उचलण्यात आल्याचं सांगितलं जातं. मात्र यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात प्रश्न निर्माण झाले आहेत की, जर टँकर प्रथा खरोखर बंद झाली असेल, तर नव्या टँकरांची गरज का भासली? स्थानिक नागरिकांमध्येही संभ्रमाचे वातावरण आहे. एकीकडे टँकर प्रथा बंद केल्याचे दावे आणि विकासाच्या घोषणा केल्या जातात, तर दुसरीकडे त्याच प्रथेला चालना देणारे निर्णय घेतले जात आहेत. या विरोधाभासी परिस्थितीमुळे आमदारांच्या विधानांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, जर जिल्ह्यात पाणीपुरवठ्यासाठी कायमस्वरूपी आणि सुयोग्य योजना प्रभावीपणे राबवली गेली असती, तर टँकरवर अवलंबून राहण्याची गरज भासली नसती. टँकर खरेदीमुळे हे स्पष्ट होते की समस्या अजूनही कायम आहे आणि प्रशासन कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात अपयशी ठरत आहे. या संपूर्ण प्रकरणावर आता स्थानिक नागरिक स्पष्ट उत्तरांची मागणी करत आहेत—टँकर प्रथा खरोखर बंद झाली आहे की ती फक्त भाषणांपुरतीच मर्यादित आहे? तसेच सार्वजनिक निधीच्या वापरात पारदर्शकता राखण्याची मागणीही जोर धरत आहे. डांग जिल्ह्याच्या विकासाच्या दाव्यांदरम्यान निर्माण झालेली ही परिस्थिती प्रशासनासाठी चिंतेची बाबत आहे आणि संबंधितांनी लवकरात लवकर स्पष्ट भूमिका मांडणे ही काळाची गरज बनली आहे.

## १ एप्रिलपासून जिल्ह्यात शुभारंभ

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील नागरिकांचे आरोग्यमान सुधारण्यासाठी आणि निरोगी समाज निर्मितीसाठी 'माझे गाव - आरोग्य संपन्न गाव' हे महत्त्वाकांक्षी अभियान राबविण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या नियोजनानुसार, १ एप्रिल २०२६ पासून संपूर्ण जिल्ह्यात या अभियानाला मोठ्या उत्साहात सुरुवात होणार आहे. अभियानाच्या पहिल्याच दिवशी, म्हणजेच १ एप्रिल २०२६ रोजी, जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये 'विशेष आरोग्य ग्रामसभा' आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# निसर्गाचा दूत होऊन काम करावे – जगताप

- जागतिक चिमणी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

दैनंदिन जीवनातील धकाधकीत माणसाला अनेक चिंतांना सामोरे जावे लागते. मात्र निसर्गाच्या सानिध्यात गेल्यानंतर मन प्रसन्न होऊन नवचैतन्य प्राप्त होते. निसर्गाची हीच खरी ताकद असून त्याचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येकाने निसर्गाचा दूत म्हणून कार्य केल्यास चांगले आरोग्य लाभू शकते, असे आवाहन श्रीगोंदा सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी पल्लवी जगताप-उंडे यांनी केले.

श्रीगोंदा तालुक्यातील सोनुबाई सखाराम महाजन शेतकी प्रशाला, मांडवगण येथे विभागीय वन अधिकारी अमोल जाधव, सहाय्यक वनरक्षक सोनल केसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक चिमणी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एन. के. रसाळ होते. यावेळी वनपाल एच. टी. गारुडकर, वनरक्षक तोरडमल, डी. बी. निलाखे, एस. आर. बनसोडे, व्ही. एम. आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात जगताप-उंडे यांनी निसर्गाचा समतोल दिवसेंदिवस ढासळत चालल्याची खंत व्यक्त केली. मोबाईल टॉवरमधील किरणोत्सर्ग, देशी झाडांची घटती संख्या, वाढते प्रदूषण, सिमेंटच्या उंच इमारती, तसेच शेतीत वापरली जाणारी रासायनिक खते व औषधांच्या फवारणीमुळे पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले. सणासुदीला पतंग उडविताना वापरल्या जाणाऱ्या मांजामुळेही चिमण्या व इतर पक्ष्यांचा मृत्यू होत असल्याने त्यांच्या संख्येत मोठी घट होत आहे, असे त्यांनी नमूद केले.

चिमण्यांना सुरक्षित घरटी उपलब्ध करून देणे, घराजवळ व बागेत धान्य-पाणी ठेवणे, तसेच विविध वृक्षप्रजातींची लागवड करणे यांसारख्या छोट्या उपाययोजनांमधून प्रत्येकाने निसर्ग संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पीपीटीच्या माध्यमातून 'चिमणी वाचवा, निसर्ग वाचवा' या विषयाचे सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही 'चिमणी संवर्धन काळाची गरज' या विषयावर मनोगते व्यक्त केली.

या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. उपस्थितांना अल्पोपहाराचेही आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दळवी सर यांनी केले, तर वनपाल एच. टी. गारुडकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मुलांना भारतीय संस्कृतीपासून दूर ठेवल्यास दुष्परिणाम अटळ : राधाकृष्ण महाराज

**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**

प्रतिनिधी "आपल्या मुलांना मूळ भारतीय संस्कृतीपासून दूर कराल, तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील," असे परखड प्रतिपादन राधाकृष्ण जी महाराज यांनी येथे सुरू असलेल्या श्रीराम कथेदरम्यान केले. कथेमध्ये भगवान रामाच्या आदर्श जीवनाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, प्रभू राम प्रभावशाली असूनही अत्यंत प्रेमळ होते. त्यांनी राजसत्ता, वैभव यांचा त्याग करून वनवास स्वीकारला आणि तेथील सर्वांवर प्रेमाचा वर्षाव केला. रामाने सुग्रीवासोबत केलेले मैत्र हे निष्ठा, विश्वास आणि कर्तव्यभावनेचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. "जे राम देतो ते कोणालाही देता येत नाही," असे ठामपणे सांगत त्यांनी भाविकांच्या मनात भक्तीभाव जागवला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पु. स्वामीजी यांनी "संतांचे दर्शन घेतल्याने माणसाचे पाप क्षीण होते आणि जीवनाला योग्य दिशा मिळते," असे सांगितले. या श्रीराम कथेसाठी पिंपळगाव परिसरातील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहून भक्तीमय वातावरणात तल्लीन झाले. कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्ती, संस्कार आणि अध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला.



पिंपळगाव येथे सुरू असलेल्या श्रीराम कथेनिमित्त उभारण्यात आलेल्या मंडप व महाप्रसाद व्यवस्थेने भाविकांची मने जिंकली असून, यंदाच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अत्यंत चोख, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे कार्यक्रमाला वेगळेच आकर्षण प्राप्त झाले आहे.

दररोज हजारो भाविक वरण-भात, पोळी, भाजी आणि गोड पदार्थ असलेल्या महाप्रसादाचा लाभ घेत आहेत. सकाळी ७ वाजता नाश्ता व चहाची सोय, तर सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत अखंड महाप्रसाद सुरू असल्याने भाविकांची सतत गर्दी पाहायला मिळत आहे. महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हा यंदाच्या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरत असून, पुरुषांच्या तुलनेत जवळजवळ दुप्पट महिलांची उपस्थिती दिसून येत आहे. महाप्रसादासाठी पेंडालच्या बाहेर लांबच लांब रांगा लागलेल्या दिसत असून, भाविकांचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे.

या भव्य आयोजनामागे पोलीस प्रशासन, स्वयंसेवक, सेवाधारी महिला तसेच विविध समित्यांचे कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत. त्यांच्या अथक सेवेचेच फलित म्हणजे हा कार्यक्रम अत्यंत देखणा, शिस्तबद्ध आणि सुखकर होत असल्याचे चित्र दिसत आहे.

आजच्या दिवशी भाविकांच्या संख्येने विक्रम गाठला असून, संपूर्ण मंडप खचाखच भरलेला दिसून आला. भक्ती, सेवा आणि उत्तम नियोजन यांचा संगम साधणारा हा सोहळा पिंपळगावकरांसाठी अभिमानाचा ठरत आहे.

## ३१ मार्चला बँका रात्री उशिरापर्यंत सुरु राहणार

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

आर्थिक वर्ष 2025-26 अखेर शासनाचा निधी अखर्चित राहू नये यासाठी 31 मार्च 2026 अखेर प्राप्त होणारी देयके पारित करून त्याच दिवशी आहरण व वितरण अधिकाऱ्यांना ई-कुबेर व धनादेशाद्वारे प्रदान करणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 409 नुसार जिल्हाधिकाऱ्यांना कोषागारातील व्यवहारासाठी सुट्टीच्या दिवशीही बँका उघड्या ठेवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने 31 मार्च 2026 रोजी शासनाचे कोषागाराशी संबंधित सर्व आर्थिक व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी भारतीय स्टेट बँक तसेच शासनाचे व्यवहार हाताळणाऱ्या जिल्हा व तालुका स्तरावरील इतर बँकांच्या शाखा रात्री उशिरापर्यंत कार्यरत ठेवाव्यात.

# सापुतारा पोलिसांची मानवतावादी पुढाकार

*सहा वर्षांपासून वेगळे राहणाऱ्या दांपत्याचा पुनर्मिलाप*

**डांग, गुजरात: (समर्थ गांवकरी)**

सापुतारा पोलीस ठाण्याच्या 'शी-टीम' आणि महिला सहाय्यता केंद्राने एक कौतुकास्पद कामगिरी केली आहे. मागील ६ वर्षांपासून वेगळे राहणाऱ्या एका दांपत्यामध्ये समेट घडवून आणत पोलिसांनी केवळ तुटलेले कुटुंब एकत्र आणले नाही, तर त्यांच्या मुलाच्या शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रांची समस्याही सोडवली.





एका महिलेने सापुतारा पोलीस ठाण्यातील महिला-आधारित सपोर्ट सेंटरमध्ये अर्ज केला होता. अर्जानुसार, ती मागील ६ वर्षांपासून पतीपासून वेगळी राहत होती आणि आपल्या मुलाचे संगोपन स्वतः करत होती. सध्या मुलाच्या शाळेत प्रवेशासाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र आणि आधार कार्ड यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांची गरज होती, जी तिच्या पतीकडे होती. वारंवार मागणी करूनही पती ही कागदपत्रे देत नसल्याने महिलेने पोलिसांची मदत मागितली. अर्ज मिळताच सापुतारा पोलिसांच्या 'शी-टीम' आणि समुपदेशकांनी तात्काळ कारवाई केली. पोलिसांनी पती-पत्नी दोघांनाही पोलीस ठाण्यात बोलावले. दोन्ही बाजूंचे संयुक्त समुपदेशन करण्यात आले. मुलाचे भविष्य बिघडू नये आणि पालक म्हणून त्यांची जबाबदारी काय आहे, याची जाणीव पोलिसांनी त्यांना करून दिली. पोलिसांच्या समजावणुकीनंतर पतीने स्वखुशीने सर्व आवश्यक कागदपत्रे पत्नीला सुपूर्द केली. हे समुपदेशन इतके प्रभावी ठरले की केवळ कागदपत्रांचा प्रश्न सुटला नाही, तर अनेक वर्षे वेगळे राहणारे हे दांपत्य पुन्हा एकत्र राहण्यास तयार झाले.

अशा प्रकारे सापुतारा पोलिसांनी एक कुटुंब तुटण्यापासून वाचवून, मुलाला वडिलांचे प्रेम आणि आईला आवश्यक न्याय मिळवून देत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

## मा. अध्यक्ष माधवराव हासे यांचे अकस्मात निधन

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे कट्टर समर्थक , संगमनेर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष माधवराव रामभाऊ हासे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात निधन झाले. माधवराव हासे हे राजापूर गावचे माजी सरपंच तथा काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कायम राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. संगमनेर तालुका पंचायत समिती सदस्य यानंतर त्यांनी संगमनेर तालुका संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्षपद त्यांनी अत्यंत कार्यक्षमपणे सांभाळले , अत्यंत गोरगरीब निराधार माणसांना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये लोकनेते नामदार थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोना संकटात त्यांनी अत्यंत समर्थपणे काम केले. याचबरोबर गावांमधील मृत झालेल्या व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी मोफत लाकूड देण्याचे कायम काम त्यांनी केले. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची पद्धत हसत खेळत जीवन जगत लहान मोठ्यांशी त्यांची मैत्री होती. एक दिलदार पणाचे कार्यकर्ते असलेले माधवराव हासे राजापूर मध्ये माधव शेठ नावाने प्रसिद्ध होते.

# जेमिमा रॉड्रिग्जच्या नेतृत्वाखाली भारतातील पहिली सुपर मारिओ मुंबई परेड

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

युनिव्हर्सल पिक्चर्स इंडियाने (वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीद्वारे वितरित) "मारिओ मुंबई परेड"च्या माध्यमातून मुंबईच्या रस्त्यांवर मारिओचे जग जिवंत केले. हा सोहळा या वर्षातील सर्वाधिक अपेक्षित चित्रपटांपैकी एक असलेल्या "द सुपर मारिओ गॅलेक्सी मुव्ही"साठी होता, जो ३ एप्रिल, २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. या अनोख्या सोहळ्यात, संपूर्ण शहर मारिओच्या रंगांनी न्हाऊन निघाले होते. १०० हून अधिक चाहते लाल रंगाचे मारिओ-थीम असलेले टी-शर्ट घालून रस्त्यावर उतरले. ही परेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CST) पासून आझाद मैदानापर्यंत पसरली होती, ज्यामुळे मुंबई सुपर मारिओच्या जगात रूपांतरित झाली होती. रंग, उत्साह आणि 'चला पुढे जाऊया' असे क्षण सर्वत्र जाणवत होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे नेतृत्व प्रसिद्ध क्रिकेटपटू जेमिमा रॉड्रिग्ज यांनी केले. त्यांच्या उपस्थितीने दिवसाची सुरुवात उत्साहात झाली. त्यांनी मैदानावर एक अविस्मरणीय समारोपही केला आणि आपल्या अनोख्या ऊर्जेने सर्वांना जोडले.




कार्यक्रमादरम्यान जेमिमा म्हणाल्या, "मारिओ डे चा भाग होणे माझ्यासाठी खरोखरच नॉस्टॅल्जिक होते. लहानपणी, मी एकतर माझ्या भावांसोबत मैदानावर क्रिकेट खेळायचे किंवा टीव्हीवर मारिओ पाहायचे. आज इथे येऊन इतक्या चाहत्यांमध्ये तोच उत्साह पाहून खूप विशेष वाटले. बालपणीच्या आठवणी आजही लोकांना जोडतात हे पाहून खूप छान वाटते." मुंबईतील या मारिओ-थीम असलेल्या कार्यक्रमाने आझाद मैदान खरोखरच अद्वितीय बनवले. वातावरण जिवंत आणि मंत्रमुग्ध करणारे होते. तिथे रेड कार्पेट होते, सोबतच अनेक मजेदार आणि संवादात्मक उपक्रमही होते.

चित्रपटाचे चाहते, इन्फ्लुएन्सर्स आणि लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक जण मारिओच्या खास लाल आणि निळ्या रंगाच्या पोशाखात दिसले. जणू काही चित्रपटाचे जगच जिवंत झाले आहे असे वाटत होते.

या कार्यक्रमात चित्रपटाचे हिंदी व्हॉईस-ओव्हर कलाकारही उपस्थित होते. यामध्ये शानूर मिर्झा (मारिओ) आणि अंकुर जावेरी (लुइगी) यांचा समावेश होता.

हे तेच आवाज आहेत ज्यांनी भारतात या पात्रांना जिवंत केले आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे चाहत्यांना या पात्रांमागील चेहऱ्यांना भेटण्याची एक विशेष संधी मिळाली. या सोहळ्याचा भाग झाल्याबद्दल मिर्झा म्हणाले, "मारिओ हे एक असे पात्र आहे ज्याने जगभरातील पिढ्यांना जोडले आहे. त्याला हिंदीमध्ये जिवंत करणे माझ्यासाठी खूप खास होते. आज मुंबईच्या रस्त्यांवर तेच प्रेम पाहून स्वप्नासारखे वाटले. ती ऊर्जा, तो जुना काळ आठवून येणारा आनंद आणि चाहते—जणू काही मारिओ खरोखरच इथे आला आहे असे वाटले." या कार्यक्रमाबद्दल बोलताना, वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डेन्झिल डायस म्हणाले, "असे काही आनंद आहेत जे सर्वांना एकत्र आणतात. जसे की क्रिकेटचा सामना, जेव्हा संपूर्ण देश श्वास रोखून धरतो, किंवा जेव्हा अनोळखी लोक चित्रपटगृहात एकत्र हसतात. 'द सुपर मारिओ गॅलेक्सी मुव्ही' तीच भावना अनुभवायला देते. भारतातही त्याचा उत्सव तसाच साजरा व्हावा अशी आमची इच्छा होती. जेमिमाला ही भावना खूप चांगल्या प्रकारे समजते. ती लोकांना जोडते. आज, रस्त्यांवरही तीच भावना जाणवली." जेव्हा जेमिमाने सुपर मारिओ गॅलेक्सी-प्रेरित पार्श्वभूमीवर मंचावर प्रवेश केला, तेव्हा वातावरण उत्साहाने भारले होते. तिने आपल्या ऊर्जेने प्रेक्षकांना गुंतवून ठेवले. जेव्हा तिने चाहत्यांसाठी एक आश्चर्य म्हणून मिस्ट्री बॉक्स क्यूबमधून प्रवेश केला, तो या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षणाचा क्षण होता. यानंतर, योशी-थीम असलेल्या अंड्यांमध्ये लपवलेले क्रिकेटचे चेंडू बाहेर काढण्यात आले. हे चेंडू तरुण क्रिकेटपटू, इन्फ्लुएन्सर्स आणि माध्यमांना वाटण्यात आले, ज्यामुळे वातावरण अधिकच अविस्मरणीय झाले.

# महाराष्ट्र ही देशाला प्रेरणा देणारे नेतृत्व, कर्तृत्व आणि महापुरूषाची भूमी : ॲड आशिष शेलार

## शहिदी दिवस आणि वंदेमातरम सार्ध शताब्दी १५० वर्षानिमित्त राजगुरूनगर येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**राजगुरूनगर : (समर्थ गांवकरी)**

हुतात्मा राजगुरु स्मारक विकास आराखडा हा मूलभूत सुविधा आणि बांधकामाचा आराखडा नसून देशाला विश्वगुरु म्हणून कार्य करणाऱ्यांचे प्रेरणास्रोत, प्रेरणास्थळ आहे, त्यामुळे या आराखड्याकरिता करण्यात येणाऱ्या भूसंपादनामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना भरीवस्वरूपात मदत करण्यात येईल, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले. केंद्रीय सांस्कृतिक कार्य विभाग, राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि राजगुरुनगर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शहिदी दिवस आणि वंदेमातरम सार्ध शताब्दी १५० वर्षानिमित्त राजगुरूनगर (ता. खेड) येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार बाबाजी काळे, केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव विवेक अगरवाल, सहसचिव समर नंदा, सांस्कृतिक कार्य व मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी ,उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार,प्रशांत बेंडसे, पोलिस उपअधीक्षक अमोल मांडवे,मुख्याधिकारी अंबादास गर्कळ, भाजप नेत्या प्रिया पवार, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ,उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, नगरसेवक, माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे ,पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते, तालुकाध्यक्ष शांताराम भोसले,देवेंद्र बुट्टे पाटील,बाळासाहेब सांडभोर. आदी उपस्थित होते.




ॲड. शेलार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजा पासून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळकापासून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत जगाला आणि देशाला प्रेरणा देणारे नेतृत्व, कर्तृत्व आणि महापुरूषाची भूमी महाराष्ट्र आहे. हुतात्मा राजगुरु यांच्या जन्म आणि पदस्पर्शाने पावन झालेले राजगुरुनगर आणि येथील माती आपल्याला पदोपदी प्रेरणा देणारी आहे. शहिद भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी तारुण्यात देशासाठी बलिदान दिले तो दिवस देशभरात शहिदी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या अमरत्वाची गोष्ट आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात येत आहे. जगभरात इंग्रजांची वास्तववादी भांडवलशाही आणि हुकूमशाही होती, त्याकाळात इंग्रजांना 'सळो की पळो' करण्याची ताकद 'वंदे मातरम' गीतामध्ये होती. स्वातंत्र्य लढ्याच्यावेळी लाखो युवक-युवती, कष्टकरी, कामगार, ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी आदी घटकांच्या मुखातून येणाऱ्या घोषणा, गीत तसेच आंदोलन आणि सत्याग्रहात केंद्रस्थानी 'वंदे मातरम' प्रेरणागीत होते, आज या गीताला १५० वर्ष पूर्ण झाले आहे.

देशाच्या संपूर्ण स्वातंत्र्य लढ्यात 'वंदे मातरम' गीत हे केंद्रस्थानी होते, या गीताची प्रेरणा घेत स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक व क्रांतिकारकांनी दिलेले त्याग, समर्पण देश कधीच विसरू शकणार नाही, त्यांचे योगदान स्मरणात ठेवणे आपले कर्तृत्व आहे, त्यासोबतच येत्या काळात भारत देशाला विकसित करण्यामध्ये आपल्या करावयाच्या कार्यामध्ये वंदे मातरम गीत प्रेरणास्थानी आहे.

शहिद दिवस आणि वंदेमातरम सार्ध शताब्दी १५० वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभाग आणि कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मिळून राज्यातील सर्व तालुक्यात 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, असे ते म्हणाले.

यावेळी आमदार काळे म्हणाले, स्वातंत्र्य संग्रामात वंदेमातरम गीत प्रेरणादायी ठरले. आज या गीताच्या सार्ध शताब्दी १५० वर्षानिमित्त आजही शहिदाच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या विचारावर वाटचाल करीत आहोत. हुतात्मा राजगुरु स्मारक विकास आराखड्याकरिता भूसंपादन आणि त्यामाध्यमातून होणाऱ्या बाधित नागरिकांच्या घराचा प्रश्न सोडवावा, तसेच श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान विकास आराखडयाच्या अनुषंगाने आमदार काळे यांनी सूचना केली. विवेक अगरवाल म्हणाले, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वंदेमातरम सार्ध शताब्दी १५० वर्षानिमित्त देशाच्या विविध भागात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याची घोषणा केली. तसेच शहिदी दिवसाचे औचित्य साधून भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतीकारक हुतात्मा शिवराम, हरी राजगुरू, हुतात्मा सुखदेव, हुतात्मा भगतसिंग यांच्यासह अन्य स्वातंत्र्यसेनानींच्या स्मृतींना उजाळा देण्यासासोबतच तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्यासाठी राजगुरुनगरमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य संग्रामामध्ये 'वंदे मातरम' स्वातंत्र्य सेनानीकरिता प्रेरणादायी गीत होते. 'वंदे मातरम' मोहिमेत जवळपास ९ कोटीहून अधिक नागरिक सहभागी झाले आहे तसेच स्वातंत्र्य संग्रामावर आधारित भव्य प्रदर्शनाला आज एक हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी भेट दिली आहे, आपणही या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हा, असे आवाहन अगरवाल यांनी यावेळी केले.

याप्रसंगी राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, उप विभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहणे, राजगुरुनगर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, मुख्याधिकारी अंबादास मर्कळ, हुतात्मा राजगुरु स्मारक समितीचे सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, नागरिक आदी उपस्थित होते.

---

## शहीद दिनी मुख्यमंत्री यांची उपस्थिती असावी, स्मारकाचे काम गतीने व्हावे

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

पंजाब (फिरोजपुर)राज्याच्या धर्तीवर शहीद दिन महाराष्ट्र राज्यात साजरा करावा तसेच दरवर्षी या दिवशी मुख्यमंत्री हुतात्मा राजगुरू यांच्या जन्मगावी राजगुरुनगर येथे उपस्थित राहून अभिवादन करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना निवेदन देण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणारे शिवराम हरी राजगुरु, भगतसिंग व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी लाहोर कारागृहात फाशी देण्यात आली. या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र शासनाने ४ सप्टेंबर २०१५ रोजी शहीद दिन साजरा करण्याबाबत परिपत्रक काढले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. पंजाब राज्यात फिरोजपूर येथील समाधीस्थळी दरवर्षी मुख्यमंत्री व मंत्री उपस्थित राहून अभिवादन करतात. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही २३ मार्च रोजी राजगुरुनगर येथे मुख्यमंत्री व मंत्र्यांची उपस्थिती राहावी, अशी मागणी खेड तालुक्यातील नागरिकांनी केली आहे. तसेच १गार्ड ऑफ ऑनर स्वरूपात शासकीय मानवंदना देण्याची परंपरा सुरू करावी, अशीही मागणी करण्यात आली. दरम्यान, हुतात्मा राजगुरू जन्मस्थळ स्मारकासाठी शासनाने डिसेंबर २०२३ रोजी १०४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून सध्या काम सुरू आहे.



---

## ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण महाराष्ट्रात सन 2024 पासून धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ऑटोरिक्षा व मीटर्ड टॅक्सी चालकांनी ऑनलाईन नोंदणी करावी व या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय अहिरे यांनी केले आहे. या कल्याणकारी मंडळाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे. वय 65 वर्षावरील चालकासाठी सन्मान निधी योजना, जीवन विमा व अपंगत्व विमा योजना कर्तव्यावर असताना, आरोग्य विषयक लाभ योजना, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसाहाय्य योजना, पाल्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना.

---

## ४ कोटींचा २ किलो ६२ ग्रॅम वजनाच्या अंमली पदार्थासह आरोपी अटकेत

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

- अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

मा. पोलीस आयुक्त, ठाणे यांनी अंमली पदार्थ विरोधात विशेष मोहीम राबविण्या संदर्भात आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाने विशेष मोहिम राबवुन उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पो हवा / गिरीष पाटील यांना मिळालेली गोपनीय माहिती त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक/जनार्दन सोनवणे यांना दिली. त्यानंतर मा. वरिष्ठांची रितसर परवानगी घेवुन सपोनि/सोमनाथ कर्णवर पाटील, पोउपनि/दिपक डुम्मलवाड व पथकास प्राप्त माहितीच्या अनुषंगाने योग्य ती शहानिशा करून कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. सदर पथकाने दिनांक दिनांक २३/०३/२०२६ रोजी सायंकाळी ७ वा. चे सुमारास एमटीएनएल ऑफीसच्या समोर, चरई, ठाणे येथे इसम नामे १) सोहेल दिलीप खान वय २६ वर्षे, रा. कोपरी, ठाणे याने आपले कब्जात एकुण १ किलो ५६ ग्रॅम तसेच २) रोहीत विलास सितापुरे वय २१ वर्षे, रा. गायकवाड पाडा नं २, उल्हासनगर याने आपले कब्जात एकुण १ किलो ६ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एमडी) पावडर हा अंमली पदार्थ असा एकुण ४,१२,४०,०००/- रू किंमतीचा एकुण २ किलो ६२ ग्रॅम वजनाचा 'एमडी हा अंमली पदार्थ आपसात संगनमत करून विक्री करण्यासाठी बेकायदेशीरपणे बाळगले असताना मिळून आले.




प्रकरणी नौपाडा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ८१/२०२६ एनडीपीएस कलम ८ (क), २१(क), २९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गुन्हयाचे बॅकवर्ड लिंकच्या तपासात आरोपी नामे राजेश हडावले वय २३ वर्षे, रा. कोपरी, ठाणे यास निष्पन्न करून त्यास देखील अटक करण्यात आले आहे. नमुद गुन्हयाचा तपास पोउपनि / दिपक डुम्मलवाड हे करीत आहेत.

अटक आरोपी यांची दिनांक २८/०३/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. हा अंमली पदार्थ कोणाकडुन आणला ? कोणास विक्री करणार होते? या अनुषंगाने पुढील तपास सुरू आहे.

---

## प्रा कुसुम संतोष चव्हाण यांना पीएचडी प्राप्त

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

अभिनव शिक्षण संस्थेचे अभिनव कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य कुसुम चव्हाण यांनी रसायनशास्त्र विषयात पीएचडी पदवी संपादन केली आहे.

सनराईज विद्यापीठ अलवर राजस्थान या यूजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठातून आपला संशोधन प्रबंध पूर्ण केला असून त्यांच्या या यशामुळे अभिनव शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रा कुसुम चव्हाण यांचा संशोधन विषय Innovative Analytical approaches for Bioactive Compound analysis & their Applications असा असून बायोऍक्टिव्ह संयुगे हे मानवी आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.हे रासायनिक घटक फळे, भाज्या ,कडधान्य, सुकामेवा आणि औषधी वनस्पतींमध्ये नैसर्गिक रित्या आढळतात आणि मानवी शरीराच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम करतात याबाबत विश्लेषणात्मक तंत्रे एनालिटिकल टेक्निक्स म्हणजेच पदार्थाचे गुणधर्म रचना आणि त्यातील घटक ओळखण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वैज्ञानिक पद्धती चा अभ्यास याद्वारे करण्यात आला. रसायनशास्त्र विषयांमध्ये या तंत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे.




प्रा कुसुम चव्हाण यांना डॉ .हेमंत कुमार सिंग यांचे मार्गदर्शन लाभले त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्णत्वास नेले .

शैक्षणिक क्षेत्रात 16 वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या प्रा कुसुम चव्हाण यांनी एम एस सी ,बी एड ,एम एड, बीए जर्नालिझम अशी उच्च शैक्षणिक पात्रता संपादन केली आहे.त्यांनी आत्तापर्यंत नऊ संशोधन लेख प्रकाशित केले असून चार राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदवला आहे तसेच एक पेटंट व एक पुस्तक देखील प्रकाशित केले आहे.त्यामुळे अध्यापनासोबत संशोधन क्षेत्रातही त्यांनी भक्कम स्थान निर्माण केले आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, संस्थेचे सचिव विक्रम नवले, कॅम्पस डायरेक्टर तथा कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ.जयश्री देशमुख ,संस्थेच्या सहसचिव प्राचार्य अल्फोंसा डी, प्रशासन अधिकारी दिलीप कुमार मंडलिक ,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

प्रा कुसुम चव्हाण यांच्या या यशामध्ये पती डॉ .संतोष चव्हाण, कुटुंबीय ,मित्रपरिवार, सहकारी यांच्या पाठिंब्यामुळेच त्यांनी हे यश संपादन केले असल्याचे भावना व्यक्त केली आहे. त्यांना पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

---

## विशेष डिजिटल शेती शाळेचे आयोजन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा अंतर्गत अभियान स्वरूपात राबविण्यात येणाऱ्या 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान" (CRT) बाबत कृषि विभाग व पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने माहे एप्रिल 2026 मध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळा घेण्यात येणार आहेत. या डिजिटल शेती शाळांमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा. तसेच प्रत्येक गावातील किमान ३०-४० शेतकऱ्यांनी डिजिटल शेतीशाळेसाठी ऑनलाईन उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे. पाणी फाउंडेशनद्वारे संचलित डिजिटल शेती शाळा हे एक ऑनलाईन व्यासपीठ आहे. तज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त आणि पीक निहाय उत्तम पद्धतींचे मार्गदर्शन झूम आणि युट्यबच्या माध्यमातून दिले जाणार आहे.

---

## अपूर्ण फिनिशिंगमुळे अपघातांना निमंत्रण

- करंडी गावात अपूर्ण रस्त्यामुळे अपघात होऊन दुचाकीस्वार गंभीर जखमी

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील करंडी गावात अपूर्ण रस्त्यामुळे आज गंभीर अपघात घडून एक दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. तुकाराम अशोक गोंदके असे जखमी तरूणाचे नाव आहे. काही दिवसांपूर्वीच ग्रामस्थांनी या रस्त्याचे काम प्रत्यक्षात अपूर्ण असूनही ते सरकारी नोंदींमध्ये "१०० टक्के पूर्ण" दाखवले जात असल्याचा व्हिडिओ तयार करून संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधले होते. मात्र या गंभीर बाबीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. प्रत्यक्षात रस्त्याचे ९० टक्के कामच पूर्ण झाले होते. अंतिम फिनिशिंग म्हणजे अंतिम डांबरी थर आणि रस्त्याच्या कडेला मातीचे साइड पॅचेस भरणे अजून बाकी होते. तरीही ठेकेदाराने काम पूर्ण झाल्याचा दावा केला होता. अंतिम डांबरी थर न दिल्यामुळे रस्त्यावर टाकलेले खडी-डांबर मिश्रण कमकुवत राहिले. अलीकडील पावसामुळे रस्त्याची मजबुती आणखी कमी झाली आणि रस्ता अत्यंत घसरडा बनला. आज याच ठिकाणी दुचाकीवरून जात असताना एका व्यक्तीची गाडी स्लिप होऊन तो घसरला. त्यामुळे त्याच्या डोक्याला गंभीर जखमी झाला असून शरीराच्या अनेक भागांना दुखापत झाली आहे. दुचाकीचे मोठे नुकसान झाले असून अनेक भाग तुटले आहेत. जखमीवर तातडीने उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर करंडी गावात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी ठेकेदारावर निष्काळजीपणाचा थेट आरोप करत, "अंतिम काम वेळेत पूर्ण केले असते तर आज हा अपघात घडला नसता," असे सांगितले. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही दखल न घेतल्याने नागरिकांमध्ये भीती आणि रोष निर्माण झाला आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर (PWD) देखील गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. "काम अपूर्ण असताना ते पूर्ण झाल्याचे दाखले कसे दिले? प्रत्यक्ष पाहणी न करता प्रमाणपत्र दिले का?" असा सवाल नागरिक विचारत आहेत.



---

## अवैध वृक्षतोड जोमात; वन विभाग कोमात

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्याच्या दुर्लक्षित कारभारांमुळे नायगाव तालुक्यात गेल्या दिड महिन्यापासून खुलेआम अवैधरीत्या वृक्षतोड करून तोडलेल्या वृक्ष ट्रॅक्टर च्या साह्याने नरसी येथील चारही राज्य महामार्गावरुन विना अडथळा राजरोसपणे वाहतुक करत कृष्णुर येथील कंपनी राहेर इज्जतगाव परिसरातील विटभट्टी आरामशीन व इतर राज्यात पाठविण्यात येत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन नायगाव तालुक्यात होत असलेली वृक्षतोड थांबवावी अशी मागणी जनतेतून होत आहे. शासनाने एकीकडे झाडे लावा झाडे जगवा पर्यावरण वाचवा असा मोलाचा संदेश देश बांधवांना दिला परंतु नायगाव तालुक्यातील नरसी मांजरम, धुप्पा, कुंचेली, धानोरा, शेळगाव गौरी, टाकळी, राहेर, हुसा सहलोहगाव बिजूर. ,कामरसपल्ली, जिगळा, टाकळी, आळंदी, केरूर, अजणी, हिप्परगा माळ, चिटमोगरा, बोरगाव थडी, अटकळी, डोणगांव, आदमपूर, बेळकोणी कोणी आदि सह अन्य गावात लाकडाचे व्यापारीअवैधरीत्या खुलेआम चिंच, आंबा, लिंब, बाभूळ, शिव बाभूळ, आदिसह अन्य वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल करीत असल्याने पर्यावरणांचा नायनाट होत आहे. वनविभागाच्या देगलूर कार्यालयाच्या अधिकारी क्षेत्रातील नायगाव, नरसी, कार्यरत कर्मचारी वर्ग यांच्या कार्यक्षेत्रात खुलेआम अवैधरीत्या वृक्षतोड करून तोडलेल्या अनेक वृक्षाची लाकडे आठ ट्रॅक्टर व नरसी येथील चारही राज्य महामार्गावरुन विना अडथळा तस्करी करुन वेगवेगळ्या ठिकाणी विक्री करण्यात येत आहे.

---

## ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे डिजिटल व्यवहारांना नवे बळ - डॉ. शीतल गिरमे

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने 'गुणवत्ता सुधार योजने' अंतर्गत ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना तज्ञ मार्गदर्शक म्हणून विषयतज्ञ डॉ.शीतल गिरमे उपस्थित होत्या. संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करून एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये पुणे,अहिल्यानगर,नाशिक विभागातील अभियांत्रिकी महाविद्यालये,बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ लोणेरे कार्यरत शिक्षक वर्ग तसेच औद्योगिक क्षेत्रातील बहुसंख्य कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.सध्या डिजिटल युगात माहिती सुरक्षित ठेवणे आणि आर्थिक व्यवहार पारदर्शक पद्धतीने करणे ही मोठी गरज बनली आहे.या पार्श्वभूमीवर 'ब्लॉकचेन' हे तंत्रज्ञान माहिती साठवण्याचे अत्यंत सुरक्षित आणि आधुनिक माध्यम म्हणून पुढे येत आहे.भविष्यात इंटरनेट वापरण्याची पद्धत बदलण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असल्याचे संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके सर यांनी सांगितले.




डॉ.शीतल गिरमे मॅडम यांनी ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि त्याचे विविध प्रत्यक्ष जीवनातील अनुप्रयोग या विषयावर सखोल आणि माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना ब्लॉकचेन प्रणालीची मूलभूत संकल्पना,विकेंद्रीत रचना,डेटा सुरक्षितता आणि पारदर्शक व्यवहारांची प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती दिली.तसेच प्रात्यक्षिक सादरीकरणाद्वारे ब्लॉकचेन नेटवर्कमध्ये व्यवहार कसे नोंदवले जातात,ब्लॉक्स कशा प्रकारे तयार होतात आणि ते साखळीप्रमाणे कसे जोडले जातात याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले.त्यांनी बँकिंग, पुरवठा साखळी व्यवस्थापन,डिजिटल व्यवहार,स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स आणि ई-गव्हर्नन्स यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा होत आहे याची प्रात्यक्षिकांसह माहिती दिली.

ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची विकेंद्रीत रचना ही त्याची मुख्य वैशिष्ट्ये मानली जातात.माहिती एका ठिकाणी न साठवता हजारो संगणकांवर एकाच वेळी साठवली जाते.त्यामुळे पारदर्शकता वाढते आणि फसवणुकीची शक्यता कमी होते.तसेच प्रगत क्रिप्टोग्राफीमुळे माहितीचे संरक्षण अधिक मजबूत होते.या तंत्रज्ञानाचा वापर केवळ डिजिटल चलन व्यवहारांपुरता मर्यादित नसून बँकिंग-वित्त,शेतीतील पुरवठा साखळी व्यवस्थापन,स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्सद्वारे करारांची अंमलबजावणी तसेच मतदान प्रणालीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठीही केला जात आहे. त्यामुळे येत्या काळात ब्लॉकचेन विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे यांनी व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर,विभागप्रमुख प्रा.निर्मल कोठारी,प्रा.अमोल खतोडे,प्रा.अमोल भोर,डॉ. चौधरी,प्रा.निलेश नागरे,प्रा.शुभम शेळके उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सचिन पोखरकर यांनी तर आभार कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा. स्नेहा शेगर यांनी मानले.

# इंद्रियाचा 'ओरिझॉन' रॅम्पवर झळकला


**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

आदित्य बिर्ला ज्वेलरीच्या 'इंद्रिया' या ब्रँडने लक्मे फॅशन वीक x एफडीसीआयमध्ये 'ओरिझॉन' हा खास कलेक्शन सादर करत भारतीय वारशाला आधुनिकतेची झळाळी दिली. प्रसिद्ध डिझायनर अमित अग्रवाल यांच्या सहयोगातून साकारलेला हा शो पारंपरिक पोल्की दागिन्यांची आधुनिक मांडणी दाखवणारा ठरला.

या शोमध्ये पोल्की आणि हिऱ्यांच्या दागिन्यांद्वारे भारतीय संस्कृतीचा वारसा साजरा करण्यात आला. त्याला अमित अग्रवाल यांच्या बनारसी विणकाम आणि काचकामाच्या अनोख्या डिझाइन्सची जोड देण्यात आली होती. परंपरा आणि आधुनिक फॅशन यांचा संगम

## पारंपरिक पोल्कीला आधुनिकतेची जोड

घडवत 'ओरिझॉन'ने रॅम्पवर एक वेगळाच अनुभव साकारला. प्रसिद्ध अभिनेत्री दिशा पटानी हिने शोस्टॉपर म्हणून रॅम्पवर वावरत या कलेक्शनला चारचाँद लावले. तिच्या वेशभूषेत इंद्रियाचे आकर्षक दागिने आणि अमित अग्रवाल यांचे आधुनिक डिझाइन यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळाला. रॅम्पवरील सादरीकरण प्रकाश आणि रचनेच्या खेळातून उलगडत गेले, ज्यात नाजूक हिऱ्यांपासून भव्य पोल्की दागिन्यांपर्यंतचा प्रवास दाखवण्यात आला. इंद्रियाचे सीईओ संदीप कोहली म्हणाले, "या शोद्वारे आम्ही पोल्की आणि हिऱ्यांना आधुनिक रूप देत भारतीय वारशाला नव्या पिढीसाठी सादर करण्याचा प्रयत्न केला. हा प्रवास परंपरेला सशक्त करणारा आणि आधुनिकतेशी जोडणारा आहे." डिझायनर अमित अग्रवाल म्हणाले, "ओरिझॉन हा परिवर्तनाचा प्रवास आहे. वेशभूषा आणि दागिने यांच्या समन्वयातून आम्ही एक नवी दृश्य कथा मांडली, जी परंपरा आणि नाविन्य यांचा सुंदर मिलाफ आहे." 'ओरिझॉन'च्या माध्यमातून इंद्रिया आणि अमित अग्रवाल यांनी भारतीय हस्तकलेला आधुनिक दृष्टिकोनातून सादर करत, परंपरेला नव्या रूपात जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला. हा शो भारतीय फॅशनमध्ये वारसा आणि नवकल्पना यांचा प्रभावी संगम ठरला.



# CII वेस्टर्न रीजनच्या 2026–27 सत्रासाठी नवीन नेतृत्वाची घोषणा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



Confederation of Indian Industry (CII) वेस्टर्न रीजनने 2026–27 सत्रासाठी आपले नवीन कार्यालयीन पदाधिकारी जाहीर केले आहेत. ही घोषणा मुंबई येथे झालेल्या पहिल्या रीजनल कौन्सिल बैठकीत करण्यात आली.

अध्यक्ष: Vir S Advani, CMD, Blue Star Limited

उपाध्यक्ष: Milon Nag, CMD, K K Nag Limited

CII वेस्टर्न रीजनने आपल्या वार्षिक बैठकीत 2026–27 सत्रासाठी धोरणात्मक अजेंडा सादर केला, ज्याचा थीम आहे: "विकसित पश्चिम: स्पर्धात्मकता, शाश्वतता, जागतिकीकरण आणि सर्वसमावेशक विकास वाढवणे". हा व्हिजन पश्चिम भारताला भारताच्या पुढील आर्थिक विकासाचा मुख्य चालक बनवण्याचे उद्दिष्ट ठेवतो. पश्चिम विभागामध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि गोवा यांचा समावेश आहे. हे क्षेत्र औद्योगिक उत्पादन, निर्यात आणि परदेशी गुंतवणुकीसाठी महत्त्वपूर्ण आहे. 'विकसित पश्चिम' अजेंड्यामुळे प्रत्येक राज्याच्या धोरणे, क्षमता आणि क्षेत्रीय संधी यांचा विचार करून प्रादेशिक विकासाला बळकटी दिली जाईल.

2026–27 साठी सहा धोरणात्मक स्तंभ आहेत: जागतिक स्पर्धात्मकता वाढवणे, व्यवसाय सुलभ करणे, आंतरराष्ट्रीय संबंध मजबुत करणे, MSME विकास, शाश्वतता प्रोत्साहन, आणि सदस्य सहभाग वाढवणे. हे औद्योगिक–सरकारी मंच, धोरण चर्चा आणि ज्ञान सत्रांद्वारे पूरक केले जातील. CII वेस्टर्न रीजन राज्य सरकार, नियामक संस्था आणि नागरी समाज यांच्यासोबत काम करून विकासाचे फायदे सर्वसमावेशक रीतीने सुनिश्चित करेल. वार्षिक बैठकीत उद्योग नेते, धोरणकर्ते, राजदूत आणि नाविन्यपूर्ण उद्योजक उपस्थित होते, ज्यांनी पश्चिम भारताच्या आर्थिक वाढीचा मार्ग ठरवणाऱ्या धोरणात्मक चर्चा आणि सहयोग यावर भर दिला.

# बाटा तर्फे उत्पादन श्रेणीमध्ये मोठा विस्तार



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सध्याच्या वाढत्या महागाई आणि बदलत्या बाजारपेठेच्या परिस्थितीत ग्राहकांना परवडणारे आणि दर्जेदार पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बाटाने पुण्यात झालेल्या डीलर मीटमध्ये आपल्या उत्पादन श्रेणीच्या मोठ्या विस्ताराची घोषणा केली.

या कार्यक्रमाला बाटा इंडिया लि.चे सहाय्यक विक्री व्यवस्थापक निर्मल तिवारी, क्षेत्रीय प्रमुख प्रियतम सिन्हा तसेच अधिकृत वितरक सिंघल ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे कपिल सिंघल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सुमारे 200 डीलर्सनी या कार्यक्रमात सहभाग घेतला, ज्यातून ब्रँडवरील विश्वास आणि मजबूत नेटवर्क स्पष्ट झाले. सध्याच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत ग्राहकांची मुख्य अपेक्षा म्हणजे कमी किंमत, उत्तम गुणवत्ता आणि दीर्घकाळ टिकणारा आराम. या गरजांचा विचार करून बाटाने तब्बल 310 पेक्षा अधिक नवीन उत्पादने बाजारात आणली आहेत. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी टिकाऊ शूज, कामकाजी पुरुष व महिलांसाठी कम्फर्टेबल फॉर्मल वेअर, मार्केटिंग व एमबीए विद्यार्थ्यांसाठी स्टायलिश आणि प्रॅक्टिकल शूज, तसेच स्पोर्ट्स आणि कॅज्युअल वापरासाठी विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, ही सर्व उत्पादने फक्त 299 रुपयांपासून उपलब्ध आहेत, जे सध्याच्या आर्थिक परिस्थितीत ग्राहकांसाठी मोठा दिलासा ठरत आहे. कमी किमतीत जास्तीत जास्त आराम आणि दर्जा देण्यावर कंपनीचा भर असल्याने ग्राहकांना चांगला अनुभव मिळत आहे.

बाटा सध्या आपल्या पारंपरिक ग्राहकांसोबतच नवीन पिढीच्या ग्राहकांनाही जोडण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. आधुनिक डिझाइन, वाढलेला कम्फर्ट आणि परवडणारी किंमत यामुळे ब्रँड ग्राहकांचा विश्वास अधिक मजबूत करत आहे.

# पेट्रोल - डिझेलचा मुबलक साठा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व गॅसचा मुबलक साठा उपलब्ध असून वितरण व्यवस्था अत्यंत सुरळीत सुरू आहे. सध्या सोशल मीडिया व व्हॉट्सअॅपवर इंधन तुटवड्याबाबत पसरवल्या जाणाऱ्या बातम्या पूर्णपणे खोट्या व दिशाभूल करणाऱ्या आहेत. नागरिकांनी अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, पॅनिक होऊन पेट्रोल पंपांवर विनाकारण गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली, पोलीस अधीक्षक व पुरवठा विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

# ठाणे येथे राष्ट्रीय कराटे स्पर्धेत कासा विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे येथील एन. के. टी. टी. महाविद्यालयात महाराष्ट्र कराटे स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ ठाणे यांच्या वतीने भव्य राष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत चार राज्यांतील तब्बल २४२ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. डहाणू तालुक्यातील कासा येथील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले. कासा येथील पूज्य आचार्य भिसे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांपैकी निलय मर्दने याने एक सुवर्णपदक, एक रौप्यपदक व चषक पटकावला. हृदवी मर्दे हिने एक सुवर्णपदक, एक रौप्यपदक व चषक जिंकत उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच आस्तिक वैष्णव याने दोन रौप्यपदके व चषक मिळवून आपली छाप पाडली.

महाराष्ट्र कराटे स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ ठाणे आयोजित ही स्पर्धा शेठ नानजीभाई खिमजीभाई



## चार राज्यांतील २४२ खेळाडूंचा सहभाग!

ठक्कर ठाणावाला महाविद्यालय, ठाणे येथे उत्साहात पार पडली. स्पर्धा विविध वयोगटात काता, कुमिते, टीम काता व टीम कुमिते अशा प्रकारांमध्ये घेण्यात आल्या. या प्रसंगी समाजरत्न श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, महाराष्ट्र कराटे स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ ठाण्याचे संस्थापक व आयोजक नासिर मुलाणी, वरिष्ठ पंच अनिल मराठे यांच्यासह सुरेश सावंत, वीर चौहान, प्रफुल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडली. यावेळी श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी आपल्या भाषणात सांगितले की, या यशामागे खेळाडूंची कठोर मेहनत, शिस्त, जिद्द तसेच प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा मोलाचा पाठिंबा आहे. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे येण्याची प्रेरणा मिळेल. विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही प्रगती करणे अत्यंत आवश्यक आहे. कराटेसारख्या क्रीडाप्रकारामुळे आत्मसंरक्षणासोबत आत्मविश्वास वाढतो आणि जीवनात यश मिळवण्यासाठी आवश्यक जिद्द निर्माण होते, असेही त्यांनी नमूद केले. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक व कराटे प्रशिक्षक निलेश गायकवाड तसेच महिला प्रशिक्षक शितल मोकळे यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेच्या शेवटी श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्ह व चषक प्रदान करण्यात आले.

# श्रीरामपूर प्रशासकीय इमारतीत लिफ्ट मंजुरीची ग्वाही

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर येथील नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत प्रांत/तहसील कार्यालय, संजय गांधी निराधार योजना कार्यालय व पुरवठा विभागात येण्यासाठी दिव्यांगांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब जिल्हा व्यवस्थापन समिती सदस्य संजय साळवे यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या निदर्शनास आणून दिली. लिफ्ट व रॅम्प नसल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणींची दखल घेत मे महिन्यात शासनामार्फत श्रीरामपूर मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी लिफ्ट मंजूर करण्यात येईल, अशी ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्हा मूकबधिर असोसिएशन, अपंग सामाजिक विकास संस्था श्रीरामपूर आणि आसान दिव्यांग संघटना महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने मूकबधिर प्रवर्गातील व्यक्तींच्या



## दिव्यांगांच्या विविध मागण्या जिल्हाधिकाऱ्यां समोर!

विविध समस्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यामध्ये संशयास्पद ऑनलाइन दिव्यांग प्रमाणपत्रांची चौकशी करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांचा पाच टक्के निधी मार्चअखेर वितरित करणे, निधीसाठी जीएसटी बिलाची सक्ती टाळणे, दिव्यांगांच्या नोकरीतील आरक्षण कोट्याची तातडीने पूर्तता करणे, मूकबधिरांना वाहनचालक परवाना देणे तसेच रोजगार योजनांची माहिती देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याच्या मागण्या करण्यात आल्या. यावेळी मूकबधिर व्यक्तींनी साइन लँग्वेजद्वारे मांडलेल्या समस्या अपंग सामाजिक विकास संस्थेचे चेअरमन संजय साळवे यांनी इंटरप्रिटर म्हणून सविस्तर मांडल्या. प्रश्नांचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेण्याचे निर्देश जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे यांना दिले. तसेच जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर येथे दिव्यांग कायदा २०१६ नुसार फ्लेक्स बोर्ड लावणे, २१ प्रकारच्या दिव्यांगांची माहिती दर्शविणे व व्हीलचेअर उपलब्ध असूनही कर्मचारी नसल्याने होणारी गैरसोय याबाबतही साळवे यांनी लक्ष वेधले. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सात दिवसांत अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले.

निवेदन देताना देविदास कोकाटे, ज्ञानदेव जाधव, आनंद कडूस, बबलू बल्लाळ, बाळू चेमटे, बाबासाहेब महापुरे, संतोष सरवदे आदी उपस्थित होते.

# माणिकडोह धरणात आजची टक्केवारी २७.९०

**शिवनेरी: (समर्थ गांवकरी)**

माणिकडोह धरणात आजची टक्केवारी २७ .९० आहे .धरणाची पातळी खोल आहे . यामुळे मुक्या जनावरांना व शेतीच्या पिकांना पाणीटंचाई लवकरच यंदा भासणार अशी चर्चा आदिवासी बांधवांमध्ये सुरू आहे . येथील आदिवासी बांधव १००% काबाडकष्ट व रोजंदारीवर अवलंबून आहे . स्वातंत्र्य काळापासून येथील आदिवासी बांधवांची पाणी प्रश्न सुटला नाही . तहसीलदार बाळासाहेब सिरसट व गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावर यांनी आदिवासी भागातील गावांची ताबडतोब पाणी संदर्भात ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थांन मार्फत मीटिंग चे आयोजन करून टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी नियोजन करणे गरज आहे . माणिकडोह धरण व या भागातील छोटे पाटबंधारे यामधील मोठ्या प्रमाणात साचलेला गाळ काढणे गरजेचे आहे.

# मारहाण करून दरोडा टाकणारी टोळी जेरबंद

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील धामणगाव पाट येथे घरात घुसून मारहाण करत दरोडा टाकणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश करून तिघांना अटक केली आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर कार्यालय व अकोले पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त पथकाने केली. दि. १९ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी सुरेखा माधव भोर (वय ३५, रा. धामणगाव पाट, ता. अकोले) या आपल्या पती व सासूसह घरी झोपलेल्या असताना पाच अज्ञात इसमांनी घराचा दरवाजा लाथ मारून उघडत आत प्रवेश केला.

आरोपींनी धक्काबुक्की व धमकावत फिर्यादीच्या गळ्यातील अर्धा तोळ्याचे मंगळसूत्र, कानातील सोन्याचे टॉप्स, सासूच्या गळ्यातील सोन्याची पोत, सोन्याचे डोरले तसेच विवो कंपनीचा मोबाईल असा



सुमारे १ लाख १० हजार रुपयांचा ऐवज लुटून नेला. याप्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १६५/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय तपास करून बबुशा पिंग्या काळे (रा. सुरेगाव, ता. श्रीगोंदा) याने साथीदारांसह गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. त्यानुसार सुरेगाव येथे सापळा रचून पोलिसांनी बबुशा पिंग्या काळे (२२), शुभम पिंग्या काळे (२०) व रवि लाला भोसले (५०, सर्व रा. सुरेगाव ता. श्रीगोंदा) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून इतर दोन साथीदारांसह हा दरोडा टाकल्याचे सांगितले. तसेच नाशिक व पुणे जिल्ह्यातही अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची कबुली त्यांनी दिली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, अकोले पोलीस स्टेशन करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अहिल्यानगर व अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली.

# मुलीवर अत्याचार करणाऱ्या पहारेकऱ्यास जन्मठेपेची शिक्षा


**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

घराजवळ खेळणा-या अल्पवयीन मुलीस खाऊचे अमिष दाखवून मंगल कार्यालयात नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीला विशेष पोक्सो न्यायाधीश डॉ. यू. जे. मोरे यांनी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. युसुफ हमीद कुरेशी (वय ३४, रा. गाझीनगर, काटवन खंडोबा, अहिल्यानगर) असे जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्या दोषीचे नाव आहे. न्यायालयाने आरोपीस भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली दोषी ठरवत शिक्षा ठोठावली असून, एकूण २२ हजार रूपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. ही दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. ऑगस्ट २०१५ मध्ये पीडिता तिच्या घराजवळ खेळत असताना आरोपीने तिला खाऊचे आमिष दाखवून अहिल्यानगर येथील एका मंगल कार्यालयात नेले व तिच्यावर अत्याचार केला. त्या वेळी आरोपी तेथे पहारेकरी म्हणून कार्यरत होता. घटनेनंतर दुसऱ्या दिवशी पीडितेच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटला विशेष पोक्सो न्यायालय तसेच जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्रमांक ६ येथे चालला. या प्रकरणात एकूण १८ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पीडिता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी व रासायनिक विश्लेषक यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. निकाल देताना न्यायालयाने नमूद केले की, पीडित मुलीचा जन्म १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी झाला असून, प्रत्येक बालिकेला सुरक्षितता, निर्भयपणे जगण्याचा व खेळण्याचा अधिकार आहे. मात्र आरोपीच्या कृत्यामुळे तिचे हे स्वातंत्र्य व सुरक्षिततेची भावना हिरावली गेली.

# 'बिलियनेअर' या सीरिजसाठी ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने केली अर्जुन रामपालची निवड

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारताची आघाडीची मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने ॲमेझॉन ॲड्सच्या कनेक्टेड वर्ल्ड्स या इव्हेंटमध्ये 'बिलियनेअर' या आपल्या आगामी ओरिजिनल सीरिजची घोषणा केली आहे. अर्जुन रामपाल प्रमुख भूमिकेत असलेल्या या सीरिजचे दिग्दर्शन नामवंत फिल्ममेकर हंसल मेहता आणि रॉबी ग्रेवाल करत आहेत. अनुभव चोप्रा आणि शांतनू सागरा यांनी या सीरिजचे लेखन केले असून प्रभलीन संधू यांनी ऑलमायटी मोशन पिक्चर या बॅनरअंतर्गत निर्मिती केली आहे. या घोषणेमुळे ॲमेझॉन एमएक्स प्लेअरच्या वाढत्या ओरिजिनल कंटेंट स्लेटमध्ये एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले असून देशभरातील प्रेक्षकांना भावेल अशा



प्रीमियम आणि खिळवून ठेवणाऱ्या कथाकथनावर असलेला त्यांचा सातत्यपूर्ण भर अधोरेखित होतो. बदलत्या भारताच्या पार्श्वभूमीवर 'बिलियनेअर' ही सीरिज एका प्रभावशाली बिझनेस मॅग्रेटच्या प्रवासाची कथा मांडते, जो आपले साम्राज्य उभे करण्यासाठी नियमच बदलतो आणि प्रभाव व महत्त्वाकांक्षेची नवी व्याख्या लिहितो. मात्र, त्याच्या यशामागचीच शक्ती जेव्हा त्याच्या आजूबाजूच्या सर्व गोष्टींना ग्रासू लागते, तेव्हा या प्रवासाचा शेवट नेमका कुठे होतो, हा प्रश्न उभा राहतो. या सीरिजबद्दल बोलताना ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे हेड ऑफ कंटेन्ट अमोघ दुसाद म्हणाले, "बिलियनेअर ही महत्त्वाकांक्षा, सत्ता आणि यशाची किंमत यांवर आधारित कथा आहे. ॲमेझॉन ॲड्सच्या इव्हेंटमध्ये या सीरिजचे अनावरण करणे आमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून आमच्या ओरिजिनल्स प्रवासाच्या पुढील टप्प्याची दिशा निश्चित करणारे आहे. हंसल मेहता आणि रॉबी ग्रेवाल यांसारख्या फिल्ममेकरसोबत काम केल्यामुळे या प्रोजेक्टला सशक्त सर्जनशीलता आणि स्पष्ट दृष्टी मिळाली आहे, तर अर्जुन रामपालने या प्रभावी व्यक्तिरेखेला गांभीर्य आणि तीव्रता दिली आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरमध्ये आम्ही देशभरातील प्रेक्षकांसाठी खिळवून ठेवणाऱ्या, सहज उपलब्ध आणि मोफत ओरिजिनल कथा सादर करण्यासाठी कटिबद्ध आहोत."

आपला उत्साह व्यक्त करताना अर्जुन रामपाल म्हणाले, "या प्रोजेक्टबद्दल मी खूप उत्साहित आहे. अशा प्रकारची भूमिका रोजच्या रोज मिळत नाहीत आणि जेव्हा अशी संधी मिळते, तेव्हा ती पूर्ण ताकदीने स्वीकारावी लागते. हंसल मेहता आणि रॉबी ग्रेवाल यांसारख्या उत्कृष्ट फिल्ममेकरसोबत काम करण्याची संधी मिळणे हे माझ्यासाठी स्वप्नपूर्तीच आहे आणि ते स्वप्न लवकरच साकार होणार आहे, यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरची उत्तम टीम या प्रवासाला अधिक खास बनवत आहे, याचा मला खूप आनंद आहे. या भूमिकेसाठीची तयारी लवकरच सुरू होणार असून मी या विश्वात पूर्णपणे रमून व्यक्तिरेखेला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे आणि एका समृद्ध प्रवासासाठी सज्ज होत आहे. आम्ही प्रेक्षकांसाठी काय सादर करत आहोत, हे पाहण्यासाठी मी खूप उत्सुक आहे." 'बिलियनेअर' ही सीरिज लवकरच फक्त ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत स्ट्रीम होणार असून हे ॲप मोबाइल डिव्हाइसेस, कनेक्टेड टीव्ही, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि एअरटेल एक्सस्ट्रीमवर उपलब्ध आहे.

# बॉयलर अटेंडंट जनरल कामगार सेनेचा वर्धापन दिन

## इचलकरंजीत भव्य मेळावा उत्साहात

**इचलकरंजी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य बॉयलर अटेंडंट जनरल कामगार सेनेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील वेद भवन सांस्कृतिक कार्यालयात भव्य बॉयलर अटेंडंट कामगार मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. राज्यातील विविध जिल्ह्यांतून बॉयलर क्षेत्राशी संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि कामगार मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सर्जेराव हळदकर होते, तर उद्घाटन दीपक भोसले यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमापूजन व महाआरतीने करण्यात आली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सत्कार सोहळा पार पडला.

संघटनेचे अध्यक्ष अंकुश वाकचौरे, उपाध्यक्ष ताराचंद चव्हाण, सचिव आनंदराव शेळके यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचा सत्कार केला. विशेष अतिथी म्हणून मिलिंद कुरणे (सभापती, शिरोळ पंचायत समिती) आणि कुमार कांबळे (जिल्हा परिषद सदस्य) उपस्थित होते.

या मेळाव्यात बॉयलर क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल सेवानिवृत्त बॉयलर सुपरवायझर शशिकांत पवार (माळेगाव सहकारी साखर कारखाना) यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट कामगिरीबद्दल अविनाश कांबळे (कोल्हापूर), राजेंद्र माने (सांगली), शिवराज बाबर (सातारा), प्रल्हाद सदावर (चंद्रगड) आणि सौरभ शिवननवर (बेळगाव) यांना 'उत्कृष्ट कामगार गुणवंत पुरस्कार' व ट्रॉफी प्रदान करण्यात आली.



मेळाव्यात मान्यवरांनी बॉयलर क्षेत्रातील सुरक्षितता, आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्यविकास यावर मार्गदर्शन केले. तसेच बेरोजगार तरुणांना या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा आणि कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

संघटनेतर्फे बॉयलर परिचर परीक्षेसाठी ऑनलाईन व ऑफलाईन मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्याची घोषणा करण्यात आली. याशिवाय, राज्यभर १५ हजार दिनदर्शिका मोफत वाटप करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. कॅलेंडरमध्ये बॉयलरविषयक माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

कार्यक्रमात विविध औद्योगिक कंपन्यांचा सहभाग होता. व्हीआर बॉयलर (बारामती), संस्कार इंजिनिअरिंग वर्क्स (संभाजीनगर), श्रीराम एंटरप्राइजेस आणि केमिकल इंजिनिअरिंग वर्क्स (कोल्हापूर) यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश वाकचौरे यांनी केले, तर प्रस्तावना ताराचंद चव्हाण यांनी मांडली. अविनाश कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण 'महा बॉयलर AGKS' या यूट्यब चॅनेलवर करण्यात आले.

या मेळाव्यामुळे बॉयलर क्षेत्रातील कामगारांना एक व्यासपीठ मिळाले असून, त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आणि कौशल्यविकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.


# लेक्ससची 'ES500e' भारतात लाँच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

■ ५८० किमी रेंजसह आलिशान इलेक्ट्रिक सेदान

लेक्सस इंडियाने भारतीय बाजारात आपली नवी पूर्णपणे विद्युत चालित 'ES500e' ही आलिशान सेदान सादर करत हरित आणि शाश्वत वाहतुकीकडे आणखी एक पाऊल टाकले आहे. कंपनीच्या इलेक्ट्रिफिकेशन धोरणातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, प्रीमियम सेगमेंटमध्ये या मॉडेलमुळे स्पर्धा वाढण्याची शक्यता आहे.

नवीन ES500e मध्ये अत्याधुनिक इलेक्ट्रिक ड्राइव्हट्रेन, शांत आणि स्मूद ड्रायव्हिंग अनुभव तसेच आधुनिक डिझाइन यांचा संगम साधण्यात आला आहे. मोठ्या क्षमतेच्या बॅटरीमुळे एका चार्जमध्ये सुमारे 580 किमीपर्यंतची रेंज मिळते, ज्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवासासाठीही हे वाहन सक्षम ठरते.



या सेदानची बाह्य रचना प्रवाही आणि आकर्षक असून, एरोडायनॅमिक्सला प्राधान्य देण्यात आले आहे. आतील भाग प्रशस्त आणि प्रीमियम असून, डिजिटल इन्स्ट्रुमेंटेशन, मोठा टचस्क्रीन डिस्प्ले, ॲम्बियंट लाइटिंग आणि उच्च दर्जाची साउंड सिस्टम यामुळे प्रवास अधिक आरामदायी होतो. आसनरचना देखील आरामदायी ठेवण्यात आली आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने या वाहनात प्रगत ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टिम्स (ADAS) समाविष्ट करण्यात आल्या असून, चालकाला अधिक सुरक्षित आणि सजग ठेवण्यासाठी विविध फीचर्स देण्यात आले आहेत. कनेक्टेड कार तंत्रज्ञानामुळे बॅटरी स्टेटस, रेंज आणि वाहन नियंत्रणाशी संबंधित माहिती सहज उपलब्ध होते.

या आलिशान इलेक्ट्रिक सेदानची किंमत सुमारे 89.99 लाख रुपये (एक्स-शोरूम) ठेवण्यात आली आहे. यासोबतच कंपनीकडून दीर्घकालीन वॉरंटी, रोडसाइड असिस्टन्स आणि विविध सेवा पॅकेजेसही उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

एकूणच, 'ES500e'मुळे भारतीय बाजारात प्रीमियम इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय अधिक मजबूत होणार असून, पर्यावरणपूरक आणि तंत्रज्ञानसमृद्ध वाहनांच्या दिशेने ग्राहकांचा कल वाढण्याची शक्यता आहे.

# रामनवमी निमित्त झी टीव्ही सिताऱ्यांनी व्यक्त केली प्रभू रामांविषयीची आपली श्रद्धा आणि भक्ती

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रामनवमी हा श्रद्धा, भक्ती आणि धर्माच्या विजयाचा प्रतीक मानला जाणारा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भगवान विष्णूंचा सातवा अवतार असलेल्या प्रभू रामांच्या जन्मदिनानिमित्त साजऱ्या होणाऱ्या या पावन दिवशी सत्य, कर्तव्य, करुणा आणि प्रामाणिकपणा या मूल्यांची आठवण पुन्हा एकदा जागवली जाते. चैत्र नवरात्राचा नववा दिवस असलेली रामनवमी उपवास, मंदिरदर्शन आणि रामायण पठणाने भक्तिभावाने साजरी केली जाते. अयोध्येतील भव्य राम मंदिरामुळे या सणाचे महत्त्व अधिकच वृद्धिंगत झाले आहे. या पवित्र निमित्ताने झी टीव्हीवरील विविध लोकप्रिय मालिकांतील कलाकारांनी प्रभू रामांविषयीची आपली श्रद्धा व्यक्त करत, त्यांच्या



आयुष्यातील रामनवमीचे खास क्षण आणि अनुभव शेअर केले. 'जगद्धात्री'मधील सोनाक्षी बत्रा हिने रामनवमी हा केवळ सण नसून अंतर्मनातील शांततेचा आणि श्रद्धेचा दिवस असल्याचे सांगितले. कुटुंबासोबत पूजा आणि प्रसाद तयार करण्याच्या आठवणी तिने जपल्या आहेत. 'तुम से तुम तक'मधील निहारिका चौक्सीने प्रभू रामांच्या मूल्यांनी तिच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन केल्याचे सांगितले. ती या दिवशी आत्मचिंतन करत कृतज्ञता व्यक्त करते. 'वसुधा'मधील अभिषेक शर्मा यानेही प्रभू रामांच्या शिकवणीमुळे कठीण प्रसंगातही संयम आणि धैर्य राखण्याची प्रेरणा मिळते, असे सांगितले. 'लक्ष्मी निवास'मधील मानसी जोशी रॉय यांनी रामनवमी आपल्याला केवळ श्रद्धा नव्हे तर कृतीतून धर्म जगण्याची शिकवण देते, असे नमूद केले. 'सरू'मधील मोहक मटकरसाठी हा दिवस शांतता, कुटुंबीयांसोबतचा वेळ आणि आत्मपरीक्षणाचा आहे. लहानपणापासून प्रभू रामांच्या कथा तिच्यासाठी प्रेरणादायी ठरल्या आहेत. 'जाने अनजाने हम मिले'मधील भरत अहलावतने हा दिवस कृतज्ञतेचा आणि नात्यांमध्ये जवळीक निर्माण करणारा असल्याचे सांगितले. कुटुंबासोबत प्रार्थना आणि नैवेद्य वाटण्याची परंपरा तो जपतो.

# 'कलाविष्कार बालचिमुकल्यांचा' कार्यक्रमाचे आयोजन!

**पांगरी : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांगरी येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'कलाविष्कार बालचिमुकल्यांचा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता शाळा परिसरात होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या शुभहस्ते होणार असून गटशिक्षण अधिकारी अरविंद कुमावत, तालुका अध्यक्ष शरद चौधरी, विस्तार अधिकारी संभाजी झावरे, इंजिनिअर भरत पारधी, केंद्र प्रमुख भांगरे साहेब, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे, राष्ट्रवादी आघाडी युवक काँग्रेसचे अध्यक्ष अक्षय आभाळे तसेच उद्योजक योगेशशेठ देशमुख आदी मान्यवर प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

# पीनट बटर रेंज लाँच करत न्युट्रिकाने आपल्या वेलनेस पोर्टफोलिओचा विस्तार केला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वात वेगाने वाढणारा 'वेलनेस फर्स्ट' एफएमसीजी (FMCG) ब्रँड बीएन ॲग्रीटेकचा जीवनशैली आणि वेलनेस ब्रँड 'न्युट्रिका'ने, न्युट्रिका पीनट बटर लाँच करत पीनट बटर श्रेणीत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. ही रेंज दैनंदिन आरोग्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चव, गुणवत्ता आणि उपयुक्तता यांचा मेळ घालणारा एक परिपूर्ण वेलनेस पोर्टफोलिओ तयार करण्याच्या दिशेने ब्रँडचे पुढचे पाऊल आहे. न्युट्रिका पीनट बटर आता दिल्ली, मुंबई, पुणे आणि चंदीगडसह 14 शहरांमधील जनरल ट्रेड स्टोअर्समध्ये (किरकोळ दुकानांमध्ये) उपलब्ध आहे. क्रंची आणि क्रीमी अशा दोन प्रकारांमध्ये उपलब्ध असलेली ही नवीन पीनट बटर रेंज, दैनंदिन फिटनेससाठी एक आरोग्यदायी स्नॅकिंगचा




पर्याय देते, ज्यामुळे पोषण सोपे आणि आनंददायी बनते. फिटनेस केवळ जिमपुरता किंवा एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादित नसून, ती एक दैनंदिन सवय आहे जी लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत संपूर्ण कुटुंब अंगीकारू शकते. रोजच्या स्प्रेड्सऐवजी पीनट बटरचा वापर करणे हा एक छोटासा आणि सोपा बदल आहे, जो घरातील सर्वांना एक आरोग्यदायी पर्याय देतो आणि संपूर्ण जीवनशैलीत एक मोठा, दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवून आणतो. हे दोन्ही प्रकार प्रथिनांनी (प्रोटीन) युक्त, फायबरने समृद्ध आणि 100% शाकाहारी घटकांपासून बनवलेले आहेत. तसेच यात कोणतेही कृत्रिम प्रिझर्व्हेटिव्ह्ज (संरक्षक) नाहीत, ज्यामुळे ते सक्रिय जीवनशैलीसाठी एक पौष्टिक आणि ऊर्जादायी पर्याय ठरतात. ही रेंज 300g, 750g आणि 900g च्या सोयीस्कर पीईटी (PET) जारमध्ये उपलब्ध आहे.


या लाँचवर भाष्य करताना, न्युट्रिकाचे संचालक आणि बिझनेस हेड स्पर्श सचर म्हणाले, "आम्ही बाजारात आणत असलेल्या प्रत्येक उत्पादनासोबतच आरोग्य सर्वांसाठी अधिक सोपे, सहज उपलब्ध आणि आनंददायी बनवणे हे आमचे ध्येय आहे. पौष्टिक अन्न चविष्टही असू शकते, या आमच्या विश्वासाचे हे पीनट बटर रेंज एक उत्तम उदाहरण आहे. आम्हाला ग्राहकांसाठी आरोग्यदायी पर्याय निवडणे सोपे आणि उत्साहवर्धक बनवायचे आहे, ज्यासाठी त्यांना कोणतीही तडजोड करावी लागू नये. आधुनिक जीवनशैलीत सहजपणे सामावून जाणारा वेलनेस ब्रँड तयार करण्याच्या दिशेने हे लाँच म्हणजे आणखी एक पाऊल आहे." न्युट्रिका बी हनी आणि जीवनसत्त्वयुक्त कुकिंग ऑइल्सच्या (खाद्यतेल) यशानंतर न्युट्रिकाने पीनट बटर श्रेणीत प्रवेश केला आहे, ज्यामुळे ब्रँडचा फंक्शन-फर्स्ट वेलनेस पोर्टफोलिओ अधिक मजबूत झाला आहे. या विस्तारामुळे, दर्जेदार परंतु सर्वांना परवडणारी उत्पादने देत न्युट्रिकाची एक सर्वसमावेशक जीवनशैली आणि वेलनेस ब्रँड बनण्याकडची वाटचाल सुरूच आहे. ही उत्पादने पौष्टिक आहाराला दैनंदिन जीवनाचा एक सहज आणि अविभाज्य भाग बनवतात.

# काळाच्या कसोटीवरही अबाधित राहणारा वॉटरप्रूफिंगचा महाविजेता

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतीय घरांना दरवर्षी दोन कठीण ऋतूंचा सामना करावा लागतो—मुसळधार पाऊस आणि उन्हाळ्यातील लाही लाही करणारी उष्णता. तरीही, अनेक घरमालक आपल्या गच्च्या आणि छतांचे संरक्षण करण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजनांवर आणि अविश्वसनीय वॉटरप्रूफिंग उपायांवर अवलंबून राहतात. त्यांच्या या अगदी अलिकडील मोहिमेद्वारे, 'एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ' एका महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करते: सर्वच वॉटरप्रूफिंग सारखे नसते.

गेल्या 13 वर्षांहून अधिक काळ, एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ' घरमालकांना त्यांच्या घरांत पाणी झिरपणे आणि तीव्र हवामानापासून संरक्षण करण्यास मदत करत आहे. हे द्रावण पाण्याचा भिंतींमध्ये शिरकाव होण्यापासून रोखणारा एक जाड, जलरोधक थर तयार




करते आणि भारतातील तीव्र हवामानापासून दीर्घकाळ टिकणारे संरक्षण पुरवते.

रणबीर कपूर आणि सौरभ शुक्ला यांची प्रमुख भूमिका असलेला या ब्रँडचा अगदी अलिकडचा चित्रपट, विनोद, मिश्किल चेष्टामस्करी आणि खेळीमेळीच्या संवादांनी ओसंडणारी एक अत्यंत जिवंत कथा सांगतो. घरमालकांच्या दैनंदिन चिंतांमध्ये रुजलेला हा चित्रपट, पावसाळ्यात छतांची गळती ते उघड्या छतामुळे होणारा उकाडा अशा सामान्य समस्यांना टिपतो आणि त्यांचे एका चित्तवेधक व मनोरंजक संभाषणात रूपांतर करतो.

केवळ गच्चीवरील गळती रोखणेच नाही तर एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ मध्ये प्रगत उष्णता-परावर्ती कोटिंगचाही समावेश आहे; ज्यामुळे पृष्ठभागाचे तापमान 10°C ने कमी होते आणि पराकोटीच्या उन्हाळ्यातही घरे थंड राहतात.

या मोहिमेद्वारे, एशियन पेंट्स देशभरातील घरमालकांचा विश्वासपात्र, वॉटरप्रूफिंगसाठी खरा उपाय म्हणून डॅम्प प्रूफला महत्त्वाचे स्थान देत विश्वासार्ह संरक्षण देण्याचे त्यांचे दीर्घकालीन वचन पुन्हा देतात. कारण, तुमच्या घराच्या संरक्षणाचा प्रश्न येतो, तेव्हा "प्रत्येक वॉटरप्रूफिंग एशियन पेंट्स डॅम्प प्रुफ नसते" (" हर वॉटरप्रुफिंग एशियन पेंट्स डॅम्प प्रुफ नही होती") एशियन पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (MD & CEO), अमित सिंगल म्हणाले, "भारतीय घरांना मुसळधार पाऊस ते अतिशय कडक उन्हाळा अशा तीव्र हवामानांना तोंड द्यावे लागते; आणि घराचा सर्वात जास्त खुला भाग हा अनेकदा गच्चीच असतो." एशियन पेंट्स डॅम्प प्रुफ अत्यंत विश्वासार्ह आणि दीर्घकाळ टिकणारे वॉटरप्रूफिंग देते; हे केवळ गळतीच रोखत नाही तर, उष्णता कमी करण्यासही मदत करते. याचे प्रगत उष्णता-परावर्ती कोटिंग पृष्ठभागाचे तापमान सुमारे 10°C ने कमी करते आणि हे 10 वर्षे वॉटरप्रुफ राहण्याची हमी देते; ज्यामुळे घरे वर्षभर संरक्षित आणि आरामदायी राहण्यास मदत मिळते. ही मोहीम हे प्रमुख लाभ आकर्षक पद्धतीने सादर करते. भारतातील 'कव्वाली' या लोकप्रिय कथाकथन प्रकाराचा वापर करून, आम्ही तांत्रिक श्रेणीचे एका रंजक संभाषणात रूपांतर केले आहे; ज्यामुळे ग्राहकांना सामान्य वॉटरप्रूफिंग आणि 'एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ वॉटरप्रूफिंग' यांमधील फरक सहजपणे समजण्यास मदत झाली आहे. रणबीर कपूर यांना संभाषणात अग्रस्थानी ठेवत, आम्ही एक महत्त्वाचा संदेश अधोरेखित करत आहोत: "प्रत्येक वॉटरप्रूफिंग एशियन पेंट्स डॅम्प प्रुफ नसते" (" हर वॉटरप्रुफिंग एशियन पेंट्स डॅम्प प्रुफ नही होती") – एशियन पेंट्स डॅम्प प्रुफ हाच वॉटरप्रूफिंगचा खरा महाविजेता आहे; जो भारतीय घरांसाठी विश्वासार्ह कामगिरी आणि राहण्याचा अधिक सुखद अनुभव देतो. ही मोहीम टेलिव्हिजन, डिजिटल, ओटीटी, समाज माध्यम प्लॅटफॉर्म्स आणि चित्रपटगृहांच्या पडद्यांवर चालवली जाईल; तसेच क्रिकेट सामन्यांदरम्यान ती विशेषत: ठळकपणे दाखवली जाईल.

# पाइपलाइन गॅस व सीएनजी वितरणासाठी केंद्र सरकारचा नवा आदेश : विना अडथळा खोदकाम करता येणार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

केंद्र सरकारने देशभरात नैसर्गिक गॅस व पेट्रोलियम उत्पादनांच्या वितरणाला गती देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेत नवीन आदेश जारी केला आहे. 24 मार्च 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या या आदेशानुसार गॅस पाइपलाइन टाकणे, देखभाल, विस्तार आणि संबंधित सुविधा उभारणीसाठी एक सुसंगत नियमावली लागू करण्यात आली आहे. अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि ऑल इंडिया पेट्रोल डिलर असोसिएशन कोअर कमिटी सदस्य अली दारूवाला यांनी दिली. दारूवाला यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या या आदेशामुळे घरगुती ग्राहकांना पाइपद्वारे नैसर्गिक गॅस (PNG) पुरवठा वाढवण्यावर भर देण्यात आला असून, एलपीजीवरील अवलंबित्व कमी करण्याचा सरकारचा उद्देश आहे. ज्या भागांमध्ये नैसर्गिक गॅस पाइपलाइन उपलब्ध आहे, तेथे एलपीजी ऐवजी पीएनजी वापरास प्रोत्साहन दिले जाणार आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, पाइपलाइन टाकताना विविध परवानग्या, जास्त शुल्क, जमीन उपलब्धतेतील अडचणी आणि रहिवासी संघटनांकडून होणारा विरोध यामुळे प्रकल्पांमध्ये विलंब होत होता. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी नवीन नियमांमध्ये परवानगी प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. या आदेशानुसार सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील संस्थांना ठराविक कालमर्यादेत पाइपलाइनसाठी परवानगी देणे बंधनकारक राहणार आहे. तसेच, परवानगी वेळेत न दिल्यास ती 'स्वतःच मंजूर' झालेली मानली जाईल, अशी तरतूद करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे, निवासी भागांमध्ये पाइपलाइन टाकण्यास कोणीही अडथळा निर्माण करू शकणार नाही. जर नागरिकांनी पीएनजी कनेक्शन घेण्यास नकार दिला, तर ठराविक कालावधीनंतर त्या ठिकाणी एलपीजी पुरवठा बंद करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने इंधनाचे विविधीकरण आवश्यक असल्याचे केंद्र सरकारने नमूद केले आहे. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अडचणी, विशेषतः खाडी प्रदेशातील परिस्थिती लक्षात घेता, देशांतर्गत गॅस वितरण मजबूत करण्यावर भर दिला जात आहे.

या निर्णयामुळे देशातील सिटी गॅस वितरण प्रकल्पांना मोठी चालना मिळण्याची अपेक्षा असून, शहरी व ग्रामीण भागात स्वच्छ इंधनाचा वापर वाढण्यास मदत होणार असल्याचे दारूवाला यांनी स्पष्ट केले.

# क्रिकेटच्या सर्वांत मोठ्या हंगामात सोशल तर्फे दुसरा स्टेडियम 2026



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

क्रिकेटचा सर्वांत मोठा हंगाम सुरू होत असताना सोशल ने मॅच डे डेस्टीनेशनचा अनुभव घेण्यासाठी 28 मार्च ते 31 मे 2026 दरम्यान दुसरास्टेडियम उपक्रम ग्राहकांसाठी पुन्हा आणला आहे. याअंतर्गत संवादात्मक फॉरमॅट सह क्रिकेट बघण्याचा अनोखा अनुभव ग्राहकांना मिळेल. याचबरोबर भारतातील लोकप्रिय टीम्सने प्रेरित विशेष मेन्यू देखील उपलब्ध असेल.यामध्ये राजस्थान बॅलेस्टिक भजियाज,हैदराबाद ओजी हलिम बिर्याणी,लखनौ भारवान गलौटी,बंगळुरू ओजी स्टेडियम सामोसा,पंजाब सिक्सर छोले भटोरे,गुजरात फरसाण प्लॅटर,मुंबई वडा प्लॅटर,दिल्ली मॅच मोमोज,कोलकाता फिले-ओ-फिश बर्गर यासारख्या चविष्ट पदार्थांचा समावेश आहे.

यावर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे इंटरॲक्टिव्ह मोबाईल क्रिकेट गेम.दुसरा स्टेडियम 2026 अनुभव हा पुणे,मुंबई,दिल्ली-एनसीआर ,बंगळुरू,हैदराबाद,कोलकाता, लखनौ,चंदीगड आणि देहरादून मधील सोशल आऊटलेटसमध्ये मिळणार आहे.

# ग्राहकांसाठी तीन नवीन टायर्स एण्ड सर्व्हिसेस स्टोअर्सचे उद्‌घाटन

## मिशलिन इंडियाचा पुण्यात विस्तार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मिशलिन या जगप्रसिद्ध टायर तंत्रज्ञान निर्मात्या कंपनीने दर्शन टायर्सच्या सहकार्याने पुणे येथे तीन नवे मिशलिन टायर्स एण्ड सर्व्हिसेस स्टोअर्स सुरु केले आहेत. आज या तिन्ही केंद्रांचे उद्‌घाटन झाले. या विस्तारामुळे मिशलिनने पुणे शहरात आपल्या उपस्थितीचा भक्कम पाया रोवला आहे. पुणे येथील नव्या तीन स्टोअर्सच्या उद्‌घाटनामुळे कंपनीचा राज्यभरातील मोठ्या विस्ताराचा मार्ग मोकळा झाला आहे. आपल्या किरकोळ विक्री केंद्रांचा विस्तार करुन कंपनीने ग्राहकांसाठी उत्तम सेवा उपलब्ध केली आहे. आता ही नवी केंद्रे ग्राहकांना सहज गाठता येतील. याच उद्देशाने नव्या स्टोअर्सची निर्मिती करण्यात आली आहे. पुणे येथील हडपसर, कॅम्प आणि चिंचवड या प्रमुख बाजारपेठांमध्ये ही तीन नवे स्टोअर्स सुरु करण्यात आले आहेत. तिन्ही नव्या केंद्रांच्या उपलब्धतेमुले ग्राहकांना मिशलिनच्या सेवा अधिक सहजपणे उपलब्ध होतील. सुमारे २ हजार ५०० चौरस फूट विस्तीर्ण जागेत हडपसर आणि चिंचवड येथील मिशलिन टायर्स एण्ड सर्व्हिसेसचे स्टोअर्स उभारले गेले आहे. कॅम्प येथील नवे स्टोअर्स १ हजार ५०० चौरस फूट अशा सुसज्ज जागेत उपलब्ध आहे. ही तिन्ही अत्याधुनिक केंद्रे पुणेकर प्रीमियम वाहनधारकांच्या गरज पूर्ण करण्यास सक्षम आहेत. या प्रत्येक एमटीएस स्टोअरमध्ये मिशलिनच्या प्रीमियम प्रवासी



कार टायरसची संपूर्ण श्रेणी उपलब्ध आहे. यासोबतच, व्हील अलाईनमेंट, बॅलन्सिंग, टायर फिटिंग, रोटेशन, दुरुस्ती आणि टायर बदलणे यांसारख्या सेवांसाठी येथे अत्याधुनिक निदान उपकरणे, अचूकता प्रदान करणा-या यंत्रसामग्री उपलब्ध आहेत. नव्या स्टोअर्सच्या उद्‌घाटनप्रसंगी मिशलिन इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. शंतनू देशपांडे म्हणाले, "देशभरात पुणे येथे आता वेगाने ऑटोमोटिव्ह बाजारपेठेचा विस्तार होत आहे. या शहरांत वाहनधारकांची संख्याही मोठी आहे. पुण्यात एकाच वेळी तीन नवे मिशलिन टायर्स एण्ड सर्व्हिसेस स्टोअर्स उपलब्ध करुन देणे हे आमच्या उच्च क्षमतेच्या बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याच्या धोरणाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. ग्राहकांना आमची उत्पादने व सेवा त्यांच्या नजीकच उपलब्ध करुन देणे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. हा विस्तार 'मेड-इन-इंडिया' पॅसेंजर कार टायर्स लाँच करण्याच्या आमच्या योजनेशी सुसंगत असून, भारतीय ग्राहकांसाठी जागतिक दर्ज्याची उत्पादने उपलब्ध करुन देण्याच्या आमच्या वचनबद्धतेची यातून पुष्टी होते." आपल्या किरकोळ विक्रीच्या विस्तारावर भर देताना, मिशलिनने ऑटोमोटिव्ह मार्केटमधील प्रसिद्ध कंपनी दर्शन टायर्ससोबत आपली दीर्घकालीन भागीदारी कायम ठेवली आहे. दर्शन टायर्स हे पुणे येथील ऑटोमोटिव्ह मार्केटमधील ३५ वर्षांहून अधिक काळ अविरहतपणे सुरु असलेली आणि विश्वासार्ह कंपनी म्हणून प्रसिद्ध आहे. या तीन नवीन मिशलिन टायर्स एण्ड सर्व्हिसेस स्टोअर्सच्या प्रारंभासह हा जुना ऋणानुबंध अधिक घट्ट झाला असून, दोन्ही भागीदार आता शहराच्या कानाकोप-यात आपल्या कंपनीच्या विस्तारावर भर देत आहेत. ११ स्टोअर्सचे भक्कम जाळे आणि दोन अत्याधुनिक डिटेलिंग स्टुडिओ असलेल्या दर्शन टायर्सचा बाजारपेठेतील दांडगा अनुभव यासह ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्याची दोन्ही कंपन्यांची कटिबद्धता या भागीदारीला सक्षम बनवते.